मंगळवार, १ ऑगस्ट २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक -७
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक



● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● TUESDAY 01 AUGUST 2023 | adhunikkesari.com Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-7 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5

# एफआयआर दाखल करायला १४ दिवस का लागले ?

## मणिपूर धिंड प्रकरण : सर्वोच्च न्यायालयाने टोचले केंद्र-राज्य सरकारचे कान

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : मणिपूर येथे नग्न धिंड काढल्याप्रकरणी पीडित महिलांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली असून याप्रकरणी सोमवारी सुनावणी पार पडली. या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाने केंद्र आणि राज्य सरकारचे कडक शब्दांत कान टोचले. मणिपूर हिंसाचारप्रकरणी न्यायालयाने केंद्र आणि राज्य सरकारला काही प्रश्न विचारले आहेत. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश डी.वाय. चंद्रचूड, न्यायमूर्ती जे. बी. पारदीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी झाली.**

हा प्रकार ४ मे रोजी घडला आणि शुन्य एफआयआर १८ मे रोजी दाखल झाला. एफआयआर दाखल करायला १४ दिवस का लागले ? असा सवाल सर्वोच्च न्यायालयाने मणिपूर पोलिसांना विचारला आहे. ४ ते १८ मेपर्यंत पोलीस काय करत होते ? असे विचारात न्यायालयाने दोन्ही सरकारांना फटकारले आहे. मणिपूर हिंसाचारात महिलांना नग्न करून त्यांची धिंड काढण्यात आली. हा एकमेव प्रकार नसेल, अशा अनेक घटना घडल्या असतील, अशी चिंताही न्यायालायने व्यक्त केली आहे. सर्वोच्च न्यायालयाने सरकारला आतापर्यंत झालेल्या अटकेबाबत माहिती देण्यास सांगितले आहे. मे महिन्याच्या सुरुवातीपासून हिंसाचाराचा फटका बसलेल्यांचे पुनर्वसन आणि मदत पॅकेजचे तपशीलही देण्यास सांगितले आहे. ४ मे रोजी घटना घडल्यानंतर कोणते अडथळे निर्माण आले होते की, ज्यामुळे तत्काळ एफआयआर दाखल करता आला नाही ? असा प्रश्न चंद्रचूड यांनी विचारला. त्यावर जनरल सॉलिसिटर तुषार मेहता यांनी प्रतिवाद केला आहे. ते म्हणाले की, १८ मे रोजी ही घटना उजेडात आल्यानंतर या प्रकाराबाबत माहिती मिळाली. घटना उजेडात आल्यानंतर २४ तासांच्या आत सात जणांना अटक करण्यात आली. ज्या पोलीस ठाणे क्षेत्रात हा प्रकार घडला त्या ठिकाणी २० एफआयआर नोंदवण्यात आल्या आहेत. तर, संपूर्ण मणिपूर राज्यातून जवळपास सहा हजार एफआयआर नोंदवल्या गेल्या आहेत. स्थानिक पोलीस या घटनेबाबत अनभिज्ञ होते का ? मग एफआयआर दंडाधिकाऱ्यांकडे का सोपवण्यात आले ? असा सवालही न्यायमूर्तींनी केला. या सहा हजार एफआयआरचं वर्गीकरण कसे करायचे ? महिलांविरोधातील किती गुन्हे आहेत ? खून, जाळपोळ, हिंसाचाराच्या प्रकरणी किती गुन्हे आहेत ? असे प्रश्नही न्यायमूर्तींना उपस्थित केले आहेत. महिला हिंसाचाराचे असे प्रकार देशभर



होतात असं सांगून याप्रकरणाचं समर्थन केलं जाऊ शकत नाही. मणिपूरप्रकरणी तुमच्या काय सूचना आहेत ? महिलांवर होणारे हल्ले इतर राज्यात होतात असं म्हणून प्रश्न सुटणार नाही. येथे प्रकरण वेगळे आहे", असंही न्यायाधीश म्हणाले.

४ मे रोजी ही घटना उघडकीस आली तेव्हा प्रथम माहिती अहवाल ( एफआयआर ) नोंदवण्यास पोलिसांना १४ दिवस का लागले, असा सवालही यात करण्यात आला आहे . सर्वोच्च न्यायालयाने सरकारला आतापर्यंत झालेल्या अटकेबाबत माहिती देण्यास सांगितले आहे. मे महिन्याच्या सुरुवातीपासून हिंसाचाराचा फटका बसलेल्यांसाठी पुनर्वसन आणि मदत पॅकेजचे तपशील. सर्वोच्च न्यायालयाने मणिपूरमधील महिलांवरील हिंसाचाराचा सामना करण्यासाठी व्यापक यंत्रणा विकसित करण्याच्या सूचना दिल्या आहेत. मे महिन्यापासून राज्यात अशा घटनांमध्ये किती एफआयआर नोंदवले गेले आहेत, याचाही तपशील न्यायालयाने मागवला आहे.

## शिक्षण मंत्र्यांचे 'ते' विधान पूर्णपणे विसंगत : अंनिस

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** राज्याचे शालेय शिक्षण मंत्री मा.दिपक केसरकर यांनी नाशिक येथील पत्रकार परिषदेत शिर्डीत असल्याने राधानगरी धरणाचे दरवाजे उघडूनही पाणी वाढले नाही असे विधान केले आहे. मात्र त्यांचे हे विधान वैज्ञानिक दृष्टिकोनातून पूर्णपणे विसंगत व आक्षेपार्ह आहे. त्यामुळे मंत्री महोदयांनी त्यांचे हे अवैज्ञानिक विधान मागे घेत असल्याचे जाहीर करून दिलगिरी व्यक्त करावी, अशी मागणी महाराष्ट्र अंनिसने त्यांना पत्र पाठवून केली आहे. मंत्री केसरकर यांनी नाशिक येथे पत्रकार परिषदेत ते कोल्हापूर येथील पूर परिस्थितीच्या वेळी ते शिर्डीत होते. तेथे त्यांनी प्रार्थना केली. त्यामुळे कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी धरणाचे दरवाजे उघडले तरीही, पुराच्या पाण्याची पातळी वाढली नाही. एरवी धरणाचे दरवाजे उघडले तर पाण्याची पातळी दोन फूट किंवा त्यापेक्षा जास्त वाढते. मात्र केवळ ते शिर्डीत असल्याने धरणाचे दरवाजे उघडले तरीही पाण्याची पातळी वाढली नाही त्यामुळे गावे पाण्याखाली गेली नाहीत. याला अंधश्रद्धा म्हणा, श्रद्धा म्हणा पण जे घडले ते सर्वांनी पाहिले असा अजब आणि चमत्कार सदृश्य दावा मंत्री केसरकर यांनी केला. शालेय शिक्षण मंत्री या अतिशय जबाबदारीच्या संवैधानिक पदावर आरूढ असलेल्या व्यक्तीने असा अवैज्ञानिक, भंपक दावा करणे हे पूर्णतः चुकीचे आहे. शिवाय राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या मूलभूत गाभा घटकात अंतर्भाव असलेल्या तसेच मूल्य शिक्षणातही ज्याचा जाणीवपूर्वक समाविष्ट करण्यात आलेला आहे. भारतीय राज्यघटनेमध्ये ५१ ( क ) मध्ये शोधक बुद्धी, मानवतावाद आणि वैज्ञानिक दृष्टीकोन याचा अंगिकार, प्रचार आणि प्रसार करणे हे प्रत्येक भारतीय नागरिकाचे मूलभूत कर्तव्य सांगितलेले आहे, अशा वैज्ञानिक दृष्टिकोन ह्या मूल्याशी मंत्री महोदयांचे विधान पूर्णपणे विसंगत व आक्षेपार्ह आहे. त्यामुळे मंत्री महोदयांनी त्यांचे हे अवैज्ञानिक विधान मागे घेत असल्याचे जाहीर करून दिलगिरी व्यक्त करावी, अशी मागणी महाराष्ट्र अंनिसच्या वतीने पत्राद्वारे त्यांच्याकडे करण्यात येत असल्याचे अंनिसचे राज्य प्रधान सचिव डॉ.टी.आर.गोराणे व राज्य कार्यवाह कृष्णा चांदगुडे यांनी कळविले आहे.

## संभाजी भिडेंवर तातडीने कारवाई करावी : राज्य महिला आयोग


आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** शिवप्रतिष्ठानचे प्रमुख संभाजी उर्फ मनोहर भिडे यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्याबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य केलं आहे. भिडे यांच्या वक्तव्यानंतर राजकीय नेत्यांकडून प्रतिक्रिया दिल्या जात आहेत. पावसाळी अधिवेशनातही याचे पडसाद उमटत आहेत. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी राज्यात अनेक ठिकाणी संभाजी भिडे यांच्याविरोधात आंदोलने केली आहे. संभाजी भिडे यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून त्यांना अटक करावी, अशी मागणी विरोधी पक्षाकडून केली जात आहे. संभाजी भिडेंच्या वक्तव्याची आता राज्य महिला आयोगाने दखल घेतली आहे.

राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहिलं आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधी, क्रांतीसूर्य महात्मा फुले यांचा अपमान महाराष्ट्र सरकार सहन करणार नाही, हे शासनाने कृतीतून दाखवून दिले पाहिजे. राज्याचे गृहमंत्री यांनी तातडीने कारवाई करावी, अशी मागणी रुपाली चाकणकर यांनी केली. याबाबतचा एक व्हिडीओ त्यांनी ट्वीटरवरून शेअर केला आहे.







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

'हो बाबा, सांगा. मी आता एका वहीत आपल्या सगळ्या वृक्षांची माहिती लिहून काढणार आणि तिथे त्यांची चित्रे चिकटवून एक छान हस्तलिखित तयार करणार.' राजेश म्हणाला. 'शाब्बास बेटा,' बाबा म्हणाले, 'बेल हा एक देशी वृक्ष आहे. बेलाची झाडे आपल्या आशिया खंडात सर्वत्र आढळतात. त्याची पाने, फुले, फळे, खोड असे सगळेच भाग औषधी आहेत. अनेक आयुर्वेदिक औषधात बेलाचा वापर केला जातो. अगदी पोटदुखीपासून ते मधुमेहाच्या आजारापर्यंत या पानांचा उपयोग होतो. बेलाच्या झाडापासून मुरंबा, जॅम, सरबत आदी गोष्टी बनवल्या जातात. बेलाच्या झाडावर पक्षी आपली घरटी बांधतात. कीटक त्याच्या आश्रयाने राहतात. त्याच्या फुलांवर बसलेल्या मधमाशा, फुलपाखरांमुळे परागीभवन होते. बेलाचे लाकूड टणक आणि टिकाऊ असल्याने त्याचा वापर फर्निचरसाठी सुद्धा केला जातो. शेतकरी शेतीची अनेक औजारे तयार करतात. मी तुम्हाला मागच्या वेळी जी वड, पिंपळ यासारख्या वृक्षांची माहिती सांगितली, त्याबरोबरच हे झाडही महत्वाचे आहे बरं, त्याचीही लागवड आपण केली पाहिजे. केवळ धार्मिकच नव्हे तर पर्यावरणाच्या दृष्टीने सुद्धा अशी झाडे खूप महत्वाची असतात.' पिंकी म्हणाली, 'बाबा, तुम्ही आणि आईने आज खूप वेगवेगळ्या विषयांची नवीन माहिती दिली आम्हाला. आम्ही आता आमच्या वहीत ही सगळी माहिती लिहून काढू.' समोरच एका ठिकाणी उसाच्या रसाची गाडी होती. सगळेच आता तहानलेले होते. राजेश म्हणाला, 'बाबा, उसाचा रस घेऊ या ना.' 'चला, आपण सगळेच रस घेऊ या,' सगळ्यांनी मस्त थंडगार आले, लिंबू घातलेल्या उसाच्या आस्वाद घेतला आणि गाडी मग पुढील प्रवासासाठी मार्गस्थ झाली. हेमाडपंती मंदिर पाहिल्यानंतर पिंकी आणि राजेश खुशीत होते. त्यातच खूप दिवसांनी उसाचा रस प्यायल्याने त्यांना आनंद झाला होता. गाडी घनदाट अशा अभयारण्यातून जात असल्याने प्रवासाची मजा काही औरच होती. एका ठिकाणी विश्रांतीसाठी जागा पाहून श्यामरावांनी गाडी थांबवली. ते ठिकाण डोंगरापासून अगदी जवळ होते. झाडांच्या गर्द सावलीत मध्यभागी मोकळी जागा होती. समोरच्या बाजूस असलेल्या भव्य डोंगररांगा लक्ष वेधून घेत होत्या. निरनिराळ्या पक्ष्यांचे आवाज कानावर पडत होते. मधूनच झाडांवर असलेली माकडे इकडून तिकडे मजेत उड्या मारीत होती. आपल्या छोट्या पिल्लाला छातीशी कवटाळून माकडिणी सुद्धा झाडांवर उड्या घेत होत्या.



## समृद्ध प्राचीन वारसा



## आनंदी पहाट

## सुखासाठी सुखासनाचीच सुरुवात सुंदर

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

प्रत्येकाची सुखाची व्याख्या निराळी असते. अर्थातच ती ज्याच्या त्याच्या अनुभूतीवर ठरत असते. कोण कशात सुख शोधेल ते सांगता येत नाही, समजूही शकत नाही. सुख म्हणजे नक्की काय असतं, हे ज्यानं त्यानं अनुभवल्या शिवाय कळू शकत नाही. सर्वांच्या नशिबात सुखाचा उपभोग लिहिलेला असतोच; ते काहींना ओंजळभर मिळतं, तर काहींना रांजणभर मिळतं. पण त्यांतून मिळणारा आनंद ज्याला कळतो तोच जगणे शिकतो. दुःखाच्या समुद्रात सुखाची लाट असतेच; फक्त थोडी वाट पहायची असते. विमानाला सुद्धा उडण्याअगोदर धावपट्टीवर वेगाची सीमा गाठण्यापर्यंत धावावंच लागतं, तेव्हा कुठे जाऊन ते आकाशांत भरारी मारू शकतं, उडू शकतं. आयुष्याचा सुद्धा हाच नियम आहे; सुखाच्या आकाशांत उडण्या अगोदर दुःखाच्या धावपट्टीवर सहनशीलतेची सीमा आपल्याला गाठवीच लागते, त्याच्याशिवाय आपण सहज आनंदाची भरारी घेऊ शकत नाही. लहान सहान गोष्टीतही सुख, शोधलं तर सापडतं. सुख म्हणजे काय असतं तसं बघितलं तर आपण दैनंदिन जीवनांत नेहमीच अनुभवत असतो. जसं खूप दिवसापासून हरवलेली एखादी अत्यंत आवडीची वस्तू अचानक सापडते तेंव्हा, ट्रॅफिक जॅममध्ये आपण फसलेले असतो तेव्हा शेजारच्या गाडीतलं लहान मूल आपल्याकडे बघून गोड हसतं तेंव्हा, आकाशात पूर्ण गोल चंद्र दिसतो तेंव्हा जे काही अंतर्मनाला होतं ना त्यांतही अनोखे सुख सामावलेलं असतं. म्हणजेच सुख एखाद्या वास्तुसारखं दिसत नसलं तरीही आपल्याला मिळालेल्या सुखाची अनुभूती आपल्या चेहेऱ्यावर दिसू लागते. कमी अधिक प्रमाणात सर्वांच्याच वाटेला कष्ट, दुःख येत असतात, परंतू त्यावेळी मन प्रसन्न, आनंदी ठेवलं कि सुख आपोआप आपल्याला शोधत येतं. मन प्रसन्न आणि आनंदी ठेवण्यासाठी दिवसाची सुरुवातच सकारात्मक विचाराने करण्याची जरुरी असल्याचं आपण समजून घेतलं पाहिजे.



आधुनिक केसरी

### स्वानंदी रांगतो | युगंधर ||

कर्मावीन नाही | देहास या मुक्ती ||
कर्म हीच शक्ती | पुण्याईची ||१||
कराल जे कर्म | तैसे लाभे फळ ||
निष्कामता | बळ असु द्यावे ||२||
सात्विकाचे ठायी | नांदतो ईश्वर ||
जाण सिध्देश्वर | कर्मयोगी ||३||
विचारे करावा | व्यवहार जगाशी ||
संवाद आत्म्याशी | साधुनिया ||४||
श्रमात राबतो | स्वधर्मी खेळतो ||
स्वानंदी रांगतो | युगंधर ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरूपण


आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

अज्ञेयाऽसि यथा लीला भवानि तव वर्तते | दारिद्र्यदुःखनाशाय दुर्गां देवीं नमाम्यहम् || ५५ || ज्याप्रमाणे तुझी लीला, त्याप्रमाणे तू देखील अज्ञेय आहेस. दारिद्र्यदुःख नष्ट करण्यासाठी मी तुला दुर्गा देवीला नमन करतो.

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

ज्ञान से मुक्ति भुक्ति है, ज्ञान से है सुख शान्ति ।
ज्ञान से जन्म सुधार है, ज्ञान से उज्वल कन्ति
।।२७।। (स्वर्वेद चतुर्थ मण्डल चतुर्थ अध्याय)
०४/०४/२७

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
ज्ञानामुळेच मुक्ति-भुक्ति (भुक्ति म्हणजेच भोग, इंद्रिय-सुख) आणि सुख-शांती ची प्राप्ती होते. ज्ञानामुळेच जीवन सुधारून उज्ज्वल कांती प्राप्त होते आणि जीवन सच्चरित्राने सुशोभित होते.

.............................................................................

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## "पिंडी ते ब्रम्हांडी"

आधुनिक केसरी




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

ब्रम्हांड --दृष्य विश्व संपूर्ण विश्वाचा विचार करणारे त्वचिंतक पिंड वब्रम्हांडाचा विचार करतात, त्याची रचना कोणत्या तत्वावर झाली. काही तत्वचिंतक तीन मुलतत्वे मानतो, 4/5/6/7मुलतत्वे आहेत असे प्रत्येक अभ्यासकाचं वेगवेगळं मत असु शकत. आत्मतत्वाचा विचार करणारे सांगतात की, या विश्वाचा पसारा पंचमहाभूतात्मक आहे. तो आत्मा नाही तर तो मूळमायेतून प्रगट झालेला आहे देहामध्ये वास करतो तो खरा आत्मा होय. विश्वामध्ये सर्वनियंता तो ईश्वर किंवा परमात्मा होय. आत्मा व परमात्मा एकच आहेत. स्वतः च्या अंतःकरणातील शुध्द आत्मस्वरूपाचा शोध केला पाहिजे तर आत्मसाक्षात्कार होतो. आणि मी परमात्माच आहे असा प्रत्यक्ष अनुभव येतो. अहंकार संपला किंवा जीवन जगत असताना मी पणाला महत्त्व न देता सर्व साक्षी जीवन जगता आले की परमात्म स्वरूप समजायला मनाचा मोठेपणा असल्यास कमी वेळ लागतो. अहंकार हे जन्माचे मूळ आहे. मी तोच म्हणजे देवचं आहे असे आत्मज्ञान करून घेणे हे मनुष्य जन्माचे सार्थक आहे. आपण जर प्रत्येक संताच्या विचारांचा अभ्यास केला तर लक्षात येते की आत्मज्ञानाचा रस्ता तर संतचं सांगत आहेत. म्हणून सतत संत विचारावर चालावे. ऊन, वारा, पाऊस, दिवस, रात्र हे झाले निसर्गाचे नियम, या नियमानुसार जगातील सर्व घटना घडतात.

## नाम हे परमात्मस्वरूप आहे

आधुनिक केसरी

नाम म्हणजे भगवंताचे नांव. साधन या दृष्टीने देवाच्या निरनिराळ्या नांवांत फरक नाही. नाम हा जीव आणि शिव यांच्यामधला दुवा आहे. नाम हे साधनही आहे आणि साध्यही आहे. नाम सगुण आहे आणि निर्गुणही आहे. नामाचा आरंभ सगुणात आहे तर शेवट निर्गुणात आहे. आरंभ सगुणात आहे असे म्हणण्याचे कारण हे की भगवंत मुळात जो निर्गुण निराकार आहे तो जेव्हा सगुणात आला तेव्हाच त्याला नामरूप लागले आणि सगुणरूप नाहीसे झाले तरी नाम शिल्लकच राहिले म्हणून ते निर्गुणही आहे. तेव्हा सगुण आणि निर्गुण भक्तीला आधार नामाचाच आहे. नाम हा सत्संगाचा पाया आहे आणि कळसही आहे. नाम म्हणजे आपली वृत्ती आणि भगवंत यांना जोडणारी साखळीच आहे. लग्न झाल्यावर स्त्री जशी नवऱ्याशी एकरूप होऊन जाते त्याप्रमाणे वृत्तिचे नामाशी लग्न होऊन ती नामरूप बनली पाहिजे. नाम हे अत्यंत सूक्ष्म आहे आणि वृत्तिसुध्दा सूक्ष्म आहे म्हणून नाम घेण्याने वृत्ती सुधारेल, वृत्ती सुधारली की चित्त शांत होईल, चित्त शांत झाले की निष्ठा उत्पन्न होईल. सगळयांचा भावार्थ एकच आहे.



अन्नाला स्वतःची चव असते त्यात आपणच आपली गोडी आणि आवड घालून नंतर ते खातो. पण नामाला स्वतःची अशी चव नाही. त्यात आपणच आपली गोडी आणि आवड घालून ते घेतले पाहिजे. आपण जितकी जास्त गोडी त्यात घालू तितके ते अधिक गोड वाटेल. पंढरपूरला जायला पुष्कळ रस्ते आहेत परंतु सर्वांना शेवटी बारीतून जाऊनच दर्शन घ्यावे लागते त्याप्रमाणे इतर साधने जरी केली तरी नामसाधन केल्यावरच आत्मस्वरूपाची प्राप्ती होते. आपण नाम घ्यावे ते आपणच आपल्या कानांनी ऐकावे आणि ते घेता घेता शेवटी स्वतःला विसरून जावे हाच नामसाधनेतला आनंदाचा मार्ग आहे.

जसे आपले आपलेपण आपल्या नांवात आहे तसे देवाचे देवपण त्याच्या नामात आहे. आपण आज जे नाम घेतो तेच नाम शेवटपर्यंत कायम राहते परंतु देहबुध्दी जसजशी कमी होत जाईल तसतसे नाम अधिकाधिक व्यापक आणि अर्थगर्भ बनत जाते आणि शेवटी नाम हे परमात्मस्वरूपच आहे असा अनुभव येतो. पाणी हे जसे शरीराचे जीवन आहे तसे नाम हे मनाचे जीवन बनले पाहिजे. नाम इतके खोल गेले पाहिजे की प्राणाबरोबर ते बाहेर पडावे. अंतकाळी अगदी शेवटी सुटणारी वस्तू म्हणजे भगवंताचे नाम पाहिजे. नामातच शेवटचा श्वास गेला पाहिजे.

## सदगुरुंचा महिमा

आधुनिक केसरी



विनायक दि.पत्की
संपर्क क्र. ९४२२२४२५१७

"मला सगुण साक्षात्कार व्हावा" असे म्हणतो, पण प्रत्यक्ष बोलणारा चालणारा सदगुरू पाहून समाधान होत नाही तर परमात्म्याचे दर्शन करून देऊन काय उपयोग ?आंबा हवा असेल तर कोय पेरल्या शिवाय कुठला मिळणार ? सदगुरूने जे सांगितले त्या परते माझे काही हित आहे,हे मनातच येऊ नये. आपण खरोखरी सर्वस्वी त्याचे व्हावे.एका सदगुरूवचनावर विश्वास ठेवला म्हणजे सुखदुःखाच्या गोष्टींचा मनावर परिणाम होत नाही.तुमचा परमार्थ ही तुमच्या स्वाधीन नाही; सद्गुरूच तो तुमच्या करिता करीत असतात; तेव्हा तुम्ही कशाची ही काळजी करू नये. जे होईल त्यात आनंद मानीत राहावे. सद्गुरुदर्शनाने पूर्वकर्मे, पापे, जळून जातात. तुमची पुढची काळजी सद्गुरू घेतात. तेव्हा पाठीमागची आठवण काढीत बसू नये आणि काळजी करू नये, समाधानात आणि आनंदात राहण्याची काळजी घ्यावी. क्रमशः

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

शोकस्थानसहस्राणि भयस्थानशतानि च दिवसे दिवसे मूढमाविशन्ति न पण्डितम् ॥

स्पष्टीकरण - हे जग अनेक बऱ्यावाईट गोष्टींनी भरलेले आहे. त्यामुळे जडबुद्धीचा मनुष्य हजारो गोष्टींची चिंता करीत बसतो. इथे भय आहे, तिथेही भय आहे, या कल्पनेने तो सदैव चिंताच करीत राहतो. त्याला पुरुषार्थासाठी पुढे पाऊल टाकावे, असे वाटतच नाही. शहाणा माणून मात्र असल्या गोष्टींची फिकीर न करता वेळ येईल तेव्हा पाहून घेईन, या धीराने काम करीत राहतो. शेवटी तोच विजयी होतो. शंकेखोर मात्र जिथल्या तिथेच राहतो.

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
मंगळवार, १ ऑगस्ट २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari

## विशेष संपादकीय

# दिलदार पत्रकार

डॉ. प्रभू गोरे, मुख्य संपादक



आयुष्याच्या प्रवासात अनेक माणसं भेटत असतात. पण काहीच माणसं अशी असतात ज्यांच्यासोबत प्रवास करताना त्यांचे कार्य, प्रत्येक गोष्टीतील सकारात्मकता, सर्वांना कायम आपल्या परीने मदत करण्याची भावना आणि बोलण्यातील आपलेपणा अशा अनेक गुणांमुळे त्यांचा सहवास हवहवासा वाटतो. अशा माणसांपैकीच आमच्या आयुष्यात आलेला एक दिलदार पत्रकार मित्र, गुरुतुल्य व्यक्तिमत्त्व प्रशांत जोशी यांनी रविवारी या जगाचा कायमचा निरोप घेतला. सकाळी साडेसातच्या सुमारास व्हाट्सपवर दैनिक मराठवाडा साथीचे मुख्य संपादक चंदुलाल बियाणी सरांनी टाकलेली जोशी सरांच्या निधनाची दुःखद पोस्ट वाचून काही क्षण आम्ही स्तब्ध झालो आणि लगेच चंदुशेठना फोन लावला. जड अंतःकरणाने त्यांनी ही दुःखद घटना खरी असल्याचे सांगितले अन् आमच्या डोळ्यासमोर जोशी सरांसोबतच्या आठवणी आकाशातील ढगांप्रमाणे पळू लागल्या. सहा - सात वर्षांपूर्वी दैनिक मराठवाडा साथी च्या छत्रपती संभाजीनगर आवृत्तीच्या कार्यकारी संपादकपदाची जबाबदारी आम्ही स्वीकारली आणि संपादक जगदीश बियाणी यांनी 'तुम्ही आता प्रशांत जोशी यांच्यासोबत बोला आणि कामाचे नियोजन करा,' असे सांगितले. परळी वैजनाथच्या मुख्य कार्यालयात दैनिक मराठवाडा साथीचे संस्थापक संपादक स्व. मोहनलालजी बियाणी यांच्या तालमीत तयार झालेले प्रशांत जोशी गेल्या अठरा-वीस वर्षांत मराठवाडा साथीमय होऊन गेले होते. चंदुशेठ, सतीशशेठ आणि जगदीश सरांना दैनिकाबद्दल जे माहीत नसेल ते प्रशांत जोशी सरांना माहीत होते. त्यांच्याशिवाय मराठवाडा साथीत काहीच होत नव्हते हे आम्ही ऐकून होतो. म्हणून थोडे घाबरतच जोशी सरांना पहिला फोन केला आणि त्यांनी तिकडून जो प्रतिसाद दिला तो ऐकून आम्हाला असे वाटलेच नाही की आपण एखाद्या नवीन व्यक्तीशी संवाद साधला. त्यांच्या बोलण्यातील आपलेपणा, काळजी करू नका ...मी आहे... आपण सोबत काम करू...दैनिक खूप चांगले आहे...बियाणी परिवार माणसांना जीव लावणारा आहे...तुम्ही लगेच काम सुरू करा....कधीही ...कसलीही अडचण असेल तर मला सांगत चला...असे बोलून त्यांनी पहिल्याच संपर्कात आमच्यात जी ऊर्जा भरली त्या ऊर्जेवरच आम्ही दैनिक मराठवाडा साथीला छत्रपती संभाजीनगरात नवी ओळख निर्माण करून दिली. दैनिकाचे काम करताना त्यांचा आणि आमचा दररोज संपर्क व्हायचा. पण कितीही घाईत, कामात असो ते कधीच फक्त कामापुरते बोलायचे नाहीत. व्यक्तिगत किंवा इकडच्या-तिकडच्या चार गोष्टी बोलल्याशिवाय आमचा संवाद पूर्ण व्हायचाच नाही. ग्रामीण समस्यांची जाण-भान आणि त्या सोडवण्याची कायम जोशी सरांची तळमळ असायची. एखादी ग्रामीण बातमी आली की ते भरभरून बोलायचे. काही जुन्या आठवणी, किस्से सांगयचे. मोहनलालजी बियाणी (काकाजी) यांच्यासोबत केलेल्या कामाच्या आठवणी तर त्यांच्यासाठी प्रेरणादायीच होत्या. मागील चार वर्षांपासून चंदुशेठ बियाणी यांच्या संकल्पनेतून मोहनलालजी बियाणी यांच्या नावाने राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार देण्यात येत आहेत. या उपक्रमात जोशी सरांचा कायम सिंहाचा वाटा असायचा. सहा महिन्याआधीच ते आणि चंदुशेठ आमचा फॉलोअप घ्यायचे. बातमी द्या...प्रस्ताव मागवा... जाहिरात द्या...पाहुणा फायनल करा...असा सतत फॉलोअप असायचा...यंदाच्या पुरस्कार सोहळ्या वेळी जोशी सरांची तब्येत थोडी नरम गरमच होती. पायाला काहीतरी जखम झाली होती. पण काकाजींच्या प्रेमाखातर आणि आमच्या आग्रहामुळे ते कार्यक्रमाला आवर्जून आले. सूत्रसंचालन हा त्यांचा आवडता छंद. मराठवाडा साथी आणि परळीतील अनेक कार्यक्रमांचे ते बहारदार सूत्रसंचालन करत. या छंदासाठी तहान - भूक हरपल्याचे व प्रसंगी आजाराकडेही दुर्लक्ष केल्याचे आम्ही पाहिले आहे. दैनिकाचे काम असल्याने रात्री उशिरापर्यंत ते जागायचे. पण दिवसा दुपारी 2 ते 5 ते मोबाईल बंद करून झोपायचे. त्यांची ही झोपायची वेळ जवळपास सर्वांनाच माहीत होती. दैनिकाबद्दल कुठलेही काम सांगा, ते नाही म्हणायचेच नाहीत....ओके...राईट..घेतो...घेतो..देतो..देतो..पाठवतो पाठवतो म्हणायचे...जोशी सरांच्या अशा एक ना अनेक आठवणी आहेत. त्या जर सांगतच राहिलो तर ही जागा कमी पडेल. त्यांच्या जाण्याने आमचे तर व्यक्तीशः कधीही न भरून येणारे नुकसान झालेच आहे, पण ग्रामीण भागासाठी जीव ओतून पत्रकारिता करणारा एक दिलदार पत्रकार गेल्याने मराठवाड्याचेही मोठे नुकसान झाले आहे. प्रभू वैजनाथ त्यांच्या आत्म्यास शांती देवो आणि जोशी परिवारास या दुःखातून सावरण्याचे सामर्थ्य देवो... हीच प्रार्थना!

# वेकोलिकडून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना १ लाख एकरी मदत द्या : आ. धानोरकर

## शेतीचे तत्काळ पंचनामे करा : रॉयल्टी घेता विकासाला पैसा का नाही ?

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** जिल्ह्यात नैसर्गिक पूरपरिस्थिती कमी उद्भवत असून वेकोलीमुळे कृत्रिम पूरपरीस्थितीती निर्माण होत आहे. त्यामुळे वेकोलिच्या ओव्हर बर्डनमुळे वरोरा - भद्रावतीसह अन्य ठिकाणी मोठ्या प्रमाणात पूरपरिस्थितीमुळे शेतपिक वाहून गेले आहे. शेतकऱ्यांचे यात आर्थिक नुकसान झाले आहे. त्यामुळे ओव्हर बर्डनमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झालेल्यांना १ लाख रुपये एकरी वेकोलिकडून मदत द्या तसेच पांदण रस्त्याकरिता ओव्हर बर्डन चे मटेरिअल वापरण्याची परवानगी द्या अशी लोकोपयोगी मागणी आमदार प्रतिभाताई धानोरकर यांनी जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्याकडे केली आहे. आज जिल्हाधिकारी यांच्या दालनात बैठक घेतली. त्यावेळी विविध विषयावर चर्चा करण्यात आली. यावेळी भद्रावतीचे तहसीलदार अनिकेत सोनवणे देखील उपस्थित होते. जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात कोळसा खाणी आहेत. परंतु जिल्ह्याच्या विकासाकरिता वरदान असलेल्या तरी शेतकरी बांधवांकरिता ह्या खाणी शाप ठरत असल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे. वेकोलिकडे प्रशासनाचे लक्ष नसल्यामुळे वेकोलि कुठेही ओव्हर बर्डनची साठवणूक करीत असतात. या ओव्हर बर्डनमुळे नदी नाल्यांच्या नैसर्गिक प्रवाहात देखील बदल झाला आहे. हा देखील गंभीर विषय असून नदी नाल्यांचे नैसर्गिक प्रवाह बदलल्यामुळे कठोर कारवाई झाली पाहिजे. त्यामुळे जास्त पाऊस आल्याने शेतीतील पिके देखील वाहून जातात. त्यामुळे लाखो रुपयांचे पीक शेतकऱ्यांचे वाहून जातात. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांचे ओव्हर बर्डन मुळे पिके वाहून गेलेली आहेत. अशा शेतकऱ्यांना तात्काळ वेकोलिकडून १ लाख रुपये निधीची मदत करण्याची लोकहितकारी मागणी आमदार धानोरकर यांनी केली आहे.



### वरोरा – भद्रावतीतील वाहतूक बंद करू : आमदार प्रतिभाताई धानोरकर

चंद्रपूर जिल्ह्यातील प्रमुख व गौण खनिजांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात निधी प्राप्त होतो . हा निधी खनिजांमुळे प्रत्यक्ष बाधित व इतर बाधित क्षेत्रांतील विकास कामांवर नियमीत खर्च झाला पाहिजे . जिल्हा खनिज प्रतिष्ठानद्वारे खनिज क्षेत्र कल्याण निधी अंतर्गत 2019–20 मध्ये 444 कामांवर 112 .97 करोड, 2020–21 मध्ये 1242 कामांवर 171 .85 करोड तर 2021–22 मध्ये 294 कामांवर 61 .53 करोड रुपये खर्च करण्यात आले . मात्र त्यानंतर 2022–23 व चालू वर्षी म्हणजेच 2023–24 मध्ये प्रत्यक्ष बाधीत व इतर बाधित क्षेत्रात खनिज विकास निधीतून एकाही विकास कामाला प्रशासकीय मंजूरी देण्यात आलेली नाही . खनिज विकास निधी अंतर्गत सद्यास्थितीत 1080 करोड रुपयांचे प्रस्ताव मंजूरीसाठी धूळ खात पडून आहेत तर सुमारे 550 करोडचा निधी जमा आहे . हा निधी खनिज विकास निधीच्या दिशानिर्देशाप्रमाणे त्वरीत खर्च झाला पाहिजे . विविध खनिजांच्या प्रदूषणामुळे परिसरातील नागरीक मोठ्या प्रमाणात बाधीत होत असतात, अशा स्थितीत हा निधी विनाकारण अडवून ठेवण्यात आला आहे . त्यामुळे हा अन्याय असून खनिज विकास निधी तात्काळ दिला नाहीतर, वरोरा – भद्रावतीतील वाहतूक बंद करू असा इशारा आमदार प्रतिभाताई धानोरकर यांनी जिल्हाधिकारी विनय गौडा यांना दिला . तात्काळ या निधीचे विकास कामाकरिता वितरण होणार असल्याची ग्वाही यावेळी जिल्हाधिकारी यांनी आमदार प्रतिभाताई धानोरकर यांना दिली .

# शेतकरी संघटनेचे अध्यक्ष रघुनाथ पाटील बीआरएसच्या वाटेवर

आधुनिक केसरी न्यूज

**सांगली :** महाराष्ट्राला लागलेला शेतकरी आत्महत्येचा कलंक पुसण्यासाठी भारत राष्ट्र समितीच्या विचारास पूरक राजकीय भूमिका घेण्याचा निर्णय घेतला असल्याचे शेतकरी संघटनेचे अध्यक्ष रघुनाथदादा पाटील यांनी सोमवारी सांगितले. भारत राष्ट्र समितीमध्ये प्रवेश करण्याबाबत मंगळवारी तेलंगणाचे मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांच्या उपस्थितीत निर्णय जाहीर करणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. तेलंगणाचे मुख्यमंत्री राव हे उद्या कोल्हापूर व सांगली दौऱ्यावर येत असून सांगलीमध्ये वाटेगाव ( ता. वाळवा ) येथे लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमासाठी येणार आहेत. अण्णाभाउ यांच्या स्मारकाच्या ठिकाणी अभिवादन केल्यानंतर जनतेशी संवाद साधणार आहेत. यानंतर त्यांनी इस्लामपूरमध्ये शेतकरी संघटनेचे अध्यक्ष पाटील यांच्या घरी भोजनाचे निमंत्रण स्वीकारले आहे. याबाबत पाटील यांनी सांगितले, जो पक्ष शेतकरी हिताचे निर्णय घेतो त्या पक्षाबरोबर राजकीय पूरक भूमिका घेतली पाहिजे अशी आमचे नेते शरद जोशी यांची शिकवण आहे. तेलंगणाचे मुख्यमंत्री केसीआर यांनी शेतकऱ्यांना उर्जितावस्था आणण्यासाठी थेट दहा हजाराचे अनुदान जाहीर केले. तसेच शेतीसाठी विविध योजनांची अंमलबजावणीही केली. शेती व्यवसाय उध्दवस्त करणारे वन कायद्याबाबतही गांभीर्याने विचार करण्याचे आश्वासन दिले आहे. तेलंगणामध्ये अल्पावधीत सिंचन योजनांची अंमलबजावणी करून सिंचन सुविधा उपलब्ध केल्या.

अधिकमास स्पेशल
ताज्या व स्वच्छ वातावरणातील
अनारसे ३०+३ वाण (साजूक तुपामधील)
अनारसे ३०+३ वाण (वनस्पती तुपातील/ तेलातील)
म्हैसूरपाक ३० + ३ वाण
बत्तासे ३० + ३ वाण
अनारसापीठ गुळाचे व साखरेचे उपलब्ध आहे
सुधीर कोर्टीकर
६५ वर्षांची परंपरा असलेले मराठवाड्यातील एकमेव
भावे
मनीभावे शुद्ध खावे
भावे आणि कंपनी
कुंभारवाडा 9850019109 | एन-5, सिडको 9325212390 | उल्कानगरी 9763685381 | पीरबाजार 8805286395 | हॉटेल विट्‌ससमोर स्टेशन रोड- 8888882709

## योगींची टीका

आधुनिक केसरी

आगामी लोकसभा निवडणुकीआधी विरोधकांपासून ते सत्ताधाऱ्यांपर्यंत सर्वच पक्षांनी जोरदार तयारी सुरू केली आहे. भाजपाप्रणित एनडीएविरुद्ध विरोधी पक्षांनी काही महिने आधीपासूनच सत्ताधारी भाजपाच्या विरोधात मोर्चेबांधणी सुरू केली आहे. २३ जून रोजी विरोधकांची बिहारच्या पाटणा येथे महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीला देशातले १६ विरोधी पक्ष एकत्र आले होते. त्यानंतर दोन आठवड्यांपूर्वी १७ आणि १८ जुलै रोजी कर्नाटकच्या बंगळुरू येथे विरोधकांची दुसरी बैठक पार पडली. यावेळी देशातील २६ विरोधी पक्ष एकत्र आले होते. या बैठकीत विरोधकांच्या या आघाडीचं नाव ठरवण्यात आले. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीसाठी विरोधी पक्षांच्या आघाडीला 'इंडिया' (INDIA – इंडियन नॅशनल डेव्हलपमेन्ट इन्क्लुझिव्ह अलायन्स) असं नाव देण्यात आलं आहे. विरोधकांच्या आघाडीला इंडिया हे नाव दिल्यापासून सत्ताधाऱ्यांकडून विरोधकांवर टीका सुरू आहे. दरम्यान, काही वेळापूर्वी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ एएनआयच्या पॉडकास्टमध्ये बोलत असताना विरोधकांच्या आघाडीवर टीका केली. योगी आदित्यनाथ म्हणाले, त्यांना इंडिया नाही बोललं पाहिजे. ते नाव I.N.D.I.A. असं आहे. प्रत्येक अक्षरानंतर डॉट्स आहेत. योगी आदित्यनाथ म्हणाले, कपडे बदलल्यामुळे पूर्वीच्या कर्मांमधून मुक्ती मिळत नाही. जनतेने यांच्या जुन्या करामती पाहिल्या आहेत. या करामती कोणाच्याही असोत, यूपीएच्या असो, काँग्रेसच्या असो अथवा समाजवादी पार्टीच्या असो किंवा अगदी आम आदमी पार्टीच्या असो, या कर्मांमधून मुक्ती मिळणार नाही. काय काय पराक्रम केले होते या लोकांनी. यामध्ये तृणमूल काँग्रेस असो अथवा सगळ्यांची परिस्थिती एकसारखी आहे. योगी आदित्यनाथ म्हणाले, हे लोक (विरोधक) कपडे बदलून देशाला भ्रमित करण्याचा प्रयत्न करत आहेत. परंतु, देशात लोकशाही आहे, लोकशाहीत राहणारे हे लोक परिपक्व आहेत.

# अण्णा भाऊ साठे : बांधिलकी जपणारा लेखक



अरविंद भराडे
संपर्क क्र. 81808 93716

आधुनिक केसरी

साहित्य हे जीवन आहे की कला? साहित्याने बांधिलकी मानावी काय? साहित्याने प्रचारकी असावे काय? यासारखे प्रश्न मराठी साहित्य विश्वामध्ये अजुन-मधून चर्चिले जातात. एक मात्र खरे आहे की सामाजिक बांधिलकी मानून, विशिष्ट विचारसरणीचा पुरस्कार करून अनेक लेखकांनी आपले साहित्य निर्माण केले आहे. ते साहित्य माणूस केंद्रित राहिले आहे. माणसांच्या दुःखाला, शोषणाला वेशीवर टांगण्याचे काम अशा प्रकारच्या साहित्याने केले आहे. मार्क्सवाद, गांधीवाद, आंबेडकरवाद, मानवतावाद यासारख्या विचारसरणीचा आग्रह आपल्या साहित्यातून धरणारे साहित्य मराठी भाषेत निर्माण झाले आहे. अण्णा भाऊ साठे या लेखकानेदेखील आपली बांधिलकी समाजाशी, मार्क्सवादाशी मानलेली दिसते. ही बांधिलकी त्यांनी प्राणपणाने जपली. त्यामुळे त्यांचे साहित्य अधिक कसदार आणि जोमदार ठरले.

मी का लिहितो, याचे स्पष्टीकरण 'वैजंयता' कादंबरीच्या प्रस्तावनेत त्यांनी केले आहे. ते लिहितात, "आपण जे जीवन जगतो तेच जीवन जगणाऱ्या बहुजन जनतेच्या मनातील स्वप्ने, विचार शब्दबद्ध करावेत या मोहाने मी लिहितो. प्रतिगामी चालीरीती दूर सारून जुन्या पण प्रगत ग्रंथांना पुन्हा पुढे आणावे. दावे, द्वेष यांचे गंभीर परिणाम दाखवावेत. या नव्या महाराष्ट्रात प्रेम सलोखा नांदावा असं मला वाटतं. माझा माझ्या देशावर, जनतेवर नि तिच्या संघर्षावर विश्वास आहे. हा देश सुखी- समृद्ध व्हावा, या भूमीचे नंदनवन व्हावे ही स्वप्नं पाहत मी लिहितो." अण्णा भाऊ साठे यांच्या या विचारातून त्यांची लेखन विषयक भूमिका, बांधिलकी जशी व्यक्त होते तशीच समाजपरिवर्तनाची त्यांची असलेली तळमळ, देशाची सुख-समृद्धी आणि देशभक्ती याचाही प्रत्यय येतो. लेखकाचा दृष्टीकोन किती व्यापक असू शकतो हे देखील यातून दिसून येते. 'पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरली आहे' या पिढ्यानपिढ्या सांगण्यात आलेल्या पारंपरिक मिथकाला अण्णांनी नकार दिला. प्रस्थापितांनी धर्माचा वापर शोषणाचे हत्यार म्हणून केला, ही विज्ञाननिष्ठ जाणीव देखील यातून व्यक्त होते. १ ऑगस्ट १९२० ते १८ जुलै १९६९ असे जवळपास ४९ वर्षांचे आयुष्य अण्णांना लाभले. मात्र अवघ्या ४९ वर्षांच्या आयुष्यात त्यांनी अनेक क्षेत्रात आपला ठसा उमटवला. त्यांचा जीवनपट त्यांच्या जीवनातील चार प्रमुख टप्प्यांनी समजून घेता येतो. एक म्हणजे वारणेच्या दऱ्या-खोऱ्यात बालपण जगलेले अण्णा. निसर्गाच्या सानिध्यात अनुभव घेणारे अण्णा. दुसरा टप्पा म्हणजे पोटाची खळगी भरण्यासाठी वाटेगाव ते मुंबई असा पायी प्रवास करणारे, पोटापाण्यासाठी नोकरीधंदा शोधणारे अण्णा. तिसरा टप्पा असा की मार्क्सवादी विचारधारा स्वीकारून दीनदलितांचे दुःख आपल्या लेखणीतून मांडणारे, संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत डफावर थाप मारून अवघा महाराष्ट्र ढवळून काढणारे अण्णा आणि चौथा टप्पा मार्क्सवादी चळवळीचा भर ओसल्यानंतर ते मृत्यूपर्यंत जगलेले, आयुष्याच्या अखेरीस डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे महत्त्व पटलेले अण्णा. सातारा जिल्ह्या तील पुणे-बंगळुरु महामार्गापासून जवळ असलेल्या वाटेगावात त्यांचा जन्म झाला. डोंगर-दऱ्या जंगल, ओढे, नाले अशा नैसर्गिक सौंदर्याने नटलेले हे गाव. वयाच्या अकरा वर्षांपर्यंत ते या गावात होते. त्यांच्या आईवडिलांनी ठेवलेले नाव तुकाराम असे होते. मात्र त्यांचे लहान बहिण-भाऊ त्यांना अण्णा म्हणत. पुढे हेच नाव रुढ झाले. अण्णा हे अस्पृश्य ठरवल्या गेलेल्या मांग जातीत जन्मले. ज्ञानाची, शिक्षणाची कुठलीही परंपरा इथल्या विषम समाज व्यवस्थेने त्यांना लाभू दिली नाही. आपल्या शिक्षणाबाबत सुद्धा अण्णांनी सांगितले आहे. 'आंबी' या त्यांच्या तिसऱ्या कथासंग्रहाच्या मनोगतात ते लिहितात, " मी मराठीतील एक कथा लेखक झालो याचेच मला आश्चर्य वाटते. आईची इच्छा होती की मी शाळेत जावे. त्याप्रमाणे एक दिवस मला शाळेत घातलं. पण मी शाळेत जाऊ शकलो नाही. कारण गुन्हेगारी जातीची सर्व मुले अंगणात बसून फुटकी पाटी घेऊन अध्ययन करीत होती. मी त्या रांगेत बैठक मारली. दुसऱ्या दिवशी गुरुजींनी वक्रदृष्टी माझ्याकडे फिरवली. त्यांनी स्पर्श न करता दुरूनच मला शासन केले. तेवढीच मला प्राप्त झाली. शाळा सुटली. पुन्हा आम्ही शाळेचे तोंड पाहिले नाही. मी माझी मराठी स्वतः शिकली नि मग लिहू लागलो. १९३४ ते १९३६ मध्ये मोठा दुष्काळ पडला. खाण्यापिण्याची मारामार सुरू झाली. त्यात भर म्हणून मांग जमातीतील गुन्हेगार ठरवून होणारा छळ या पार्श्वभूमीवर अण्णांना वाटेगाव ते मुंबई असा पायी प्रवास करावा लागला. हा त्यांच्या जीवनातील महत्त्वाचा टप्पा आहे. मुंबईला आल्यावर त्यांनी पोटाची खळगी भरण्यासाठी कापड्याच्या पेट्या वाहिल्या. कोळसा विकला. हॉटेल बॉय म्हणून काम केले. पॉलिश केली. सिनेमागृहात डोअरकीपर म्हणून राहिले. चित्रपट सृष्टीत ड्रेसिंगबॉय म्हणून काम केले. नंतर खाण कामगार झाले. अण्णांनी जे पाहिले, अनुभवले ते साहित्यातून मांडले. उपेक्षित, वंचित गिरणी कामगार यांची दुःखे पाहिलेल्या, भोगलेल्या अण्णांना साम्यवादी विचार जवळचा वाटला. त्यांनी भावनेतून वैचारिकता कशी घडवली याचे वर्णन डॉ. यशवंत मनोहर यांनी सुंदररित्या केले आहे. डॉ. मनोहर लिहितात, "त्यांनी फुलांचे डोळे घेतले आणि जीवनातील कुरुपता दिसली. त्यांनी आंबेडकरांचे मन घेतले आणि त्यांना येथील विषमता दिसली. त्यांनी मार्क्सची माणुसकी घेतली आणि त्यांना इथला नरक दिसला." अशाप्रकारे अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यात मार्च फुले-आंबेडकर यांच्या विचारांची प्रेरणा दिसते, त्याही पुढे जाऊन असे म्हणता येईल की जीवनात इतके कडवट अनुभव त्यांना आले. असह्य दुःख भोगले. मात्र त्यांच्या लिखाणात कुठेही आक्रस्ताळेपणाची, सुडाची भावना दिसत नाही. कुठेतरी बुद्ध विचारातील करुणाही त्यांच्या साहित्यातून ओथंबताना दिसते. अण्णा हे स्वतः जातीव्यवस्थेच्या पोषणाचे आणि भांडवलशाहीच्या शोषणाचे चटके भोगलेले लेखक होते. त्यामुळे त्यांना दलित, शोषितविषयी खूप सहानुभूती होती.



त्यांच्या उत्थानासाठी अण्णांनी आपली लेखणी चालवली. शोषक आणि शोषित संघर्ष, काळाबाजार अन्नधान्य टंचाई, महागाई, दैन्य दारिद्र्य, कर्जबाजारीपणा कामगारांचे संप आणि मोर्चे असे समकालीन ज्वलंत विषय त्यांनी लोकनाट्यातून प्रभावीपणे मांडले. तत्कालीन समाजाच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी आणि साप्ताहिक 'लोकयुद्ध', 'युगांतर' मध्ये पत्रकारिता केली. सातारा जिल्ह्यातील वाटेगाव परिसरातील भीषण दुष्काळावर वार्तापत्र लिहिली. तसेच कष्टकरी शेतमजूर, शेतकरी, भिकारी, बलात्कारित स्त्री, अन्यायाने गुन्हेगार बनलेले तुरुंगवासी यांच्या मुलाखती घेऊन प्रसिद्ध केल्या. त्यांची पत्रकारिता ही खऱ्या अर्थाने लोक पत्रकारिता होती. १९४२ मध्ये बंगालमध्ये पडलेल्या दुष्काळात अण्णाभाऊंनी गव्हाणकर, अमर शेख या सहकाऱ्यांच्या मदतीने 'बंगालची हाक' हा पोवाडा रचून जाहीर कार्यक्रम केला. दुष्काळग्रस्तांना मदत निधी पाठवला. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतही अण्णांचे मोठे योगदान राहिले. 'माझी मुंबई' या वगनाट्यत संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या निमित्ताने मुंबई कोणाची ? या मुद्द्यावर अण्णांनी मुंबई कष्टकऱ्यांची, कामगारांची आहे अशी ठाम भूमिका मांडली. अण्णा भाऊ साठे, अमर शेख, गवाणकर यांच्या कलापथकाचा तमाशा बघण्यासाठी हजारो माणसे बैलगाड्या जोडून येत. मुंबईत मैदान तुडुंब भरत होती. त्यामुळे संतप्त झालेल्या मोरारजी देसाई यांनी तमाशावर बंदी घातली. त्यानंतर अण्णांनी शक्कल लढवली. त्यांनी 'माझी मुंबई' हा वग लाखोंचा समुदायपुढे सादर करताना प्रारंभी जाहीर केले की, मायबाप सरकारने तमाशावर बंदी आणली आहे म्हणून आज आम्ही आपल्या समोर 'माझी मुंबई' हे लोकनाट्य सादर करीत आहोत. टाळ्यांचा कडकडाट आणि पोलिसांच्या उपस्थितीत तमाशाचे लोकनाट्यात असे नामकरण करण्याचे ऐतिहासिक कार्य अण्णांनी केले. म्हणूनच त्यांना आधुनिक लोकनाट्याचे जनक असे म्हटले जाते. अण्णांनी सुमारे ६०-६५ कलाकृतींची निर्मिती केली. बरबाद्या कंजारी, चिरानगरची भुतं, निखारा, लाडी, कृष्णाकाठच्या कथा इत्यादी कथासंग्रह. फकिरा, माकडीचा माळ, वारणेचा वाघ, वारणेचा खोऱ्यात, ठासलेल्या बंदुका इत्यादी ३५ कादंबऱ्या.

आकलेची गोष्ट, बिलंदर बुडवे, शेटजीचं इलेक्शन इत्यादी १४ लोकनाट्य. तीन नाटके, एक प्रवास वर्णन, दहा पोवाडे अशी विपुल साहित्यनिर्मिती केली. त्यांनी उपेक्षितांचे दुःख, दैन्य दारिद्र्य हे आपल्या लेखनाचे विषय केले. श्रमिकांच्या दुखाला वाचा फोडली. पोवाडे, लावणी, गीते, कथा, कादंबरी, प्रवासवर्णन, नाटक, लोकनाट्य असे विविध वाङमय प्रकार यशस्वीपणे हाताळले. अण्णा भाऊ साठे हे बंद खोलीत बसून लेखन करणारे नव्हते तर, जनआंदोलनात सहभागी होऊन आपली लेखणी न्यायाच्या, आत्मसन्मानाच्या, माणुसकीच्या बाजूने लेखणी चालवणारे लेखक होते. मराठी साहित्याला ज्ञात नसलेले अनुभवविश्व, भाषा, वातावरण निर्मिती, निसर्गसौंदर्याचे अनोखे दर्शन, व्यक्तिरेखांचे वेगळेपण ही ठळक वैशिष्ट्ये त्यांच्या साहित्याची जाणवतात. त्यांच्या संघर्षशीलतेचे वर्णन डॉ. बाबुराव गुरव यांनी पुढीलप्रमाणे केले आहे-परिस्थितीच्या अशा क्रूर थापडा खाणारा अण्णा भाऊतील कलावंत मात्र अखेरपर्यंत जागा होता. स्वराज्याचे सर्व कढ पचवीत आयुष्याच्या सायंकाळी त्यांनी आत्मचरित्र लिहिण्यास घेतले. (मृत्यूकडून जीवनाकडे) मृत्यूवरही विजय मिळवणारा मृत्युंजय कलावंत ते यातून साकारणार होते. मात्र सुरुवातीचे काही पाने लिहिणे होताच ते आजाराच्या स्वाधीन झाले." अण्णांचे आत्मचरित्र अपूर्णच राहिले. हा महान लेखक १८ जुलै १९६९ रोजी काळाच्या पडद्याआड गेला.

# वाईट वेळ वाट्याला येणे म्हणजे संपणे असं अजिबात नाही



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

निसर्ग चक्र वेळेच्या भोवती फिरत वेळ हि प्रभावी असेल तर सगळं काही सुरळीत असतं.पण वेळ प्रभावी नसली तर मग संकटांची मालिका सरत नाही.वेळेचा प्रतिकुल आणि अनुकुल प्रभाव प्रत्येकाच्या जीवनात अनुभावास येतच असतो .वेळ प्रतिकुल झाली म्हणजे पिछेहाट जरूर होते .पण पिछेहाट होण म्हणजे संपुष्टात येण असं होतं नाही . प्रतिकुल वेळ अनुकूल सुद्धा होऊ शकते पण त्यासाठी काही काळ हा वाईट जाणवतो तो व्यतित करावाच लागतो त्या मध्ये कोणालाही विशेष सुट मिळत नाही. जीवन आणि वेळेचा प्रभाव याला सृष्टी वर कोणीही अपवाद नाही. सृष्टी वर जन्म घेतलेल्या प्रत्येक जीवाला वेळेच्या प्रभावाला सामोरे जाणेही ही जाणे आहे .

मग तो दिग्गज असो कि सर्वसामान्य आयुष्य म्हटलं कि चांगली वाईट वेळ वाट्याला येणार म्हणजे येणारच या मध्ये काही शंका नाही पण वाईट वेळ ही थोडी कठिण असल्याने ही वेळ कोणालाही नकोशी असतेच.वाईट वेळ आली म्हणजे आपण संपलो अथवा हि वेळ आपल्याला संपविण्यासाठी अथवा संपुष्टात आणण्यासाठी आली आहे असं अजिबात नाही.जीवन म्हणजे संघर्ष हे सुत्र समजलं तर मग वाईट वेळ सुद्धा आपलं काही बिघडवु शकत नाही. संघर्ष हे वेळेवर जलिम औषधं असतं . वाईट वेळ संधी घेऊन येते तीच सोन करता आलं पाहिजे पण अनेकदा आपण वाईट वेळेच सोन करण्या ऐवजी राख करतो .आणि वेळेला दोष देतो .दोष हा वेळेचा कधीच नसतो वेळेला आणि काळाला प्रत्येकाकडे जाणच आहे फक्त कोणाकडे कधी जायचं हे वेळेच्या हाती असतं .पण कालचक्र कोणालाही सोडत नाही . फक्त काळाच्या प्रभावात स्वतःला टिकवून ठेवणे आणि खंबीर पणे उभा राहण्याची आवश्यकता असते. आपल्या जीवनात वेळचा प्रभाव कधी निर्माण होऊन त्याचे काही दुष्परिणामही हे आपल्यालाभोगावे लागतात याला कोणीच अपवाद नाही जोपर्यंत वेळ आणि काळ यांचं पाठबळ आहे तो पर्यंत आपलं सगळं काही पाहिजे तसं घडत पण एकदा का वेळ फिरली कि आपली जशी अपेक्षा आहे त्याच्या उलटं परिणाम येतात आणि आपसुकच हे परिणाम आपल्यासाठी आणि आपल्या जवळपासच्या लोकांसाठी आनंददायी नसतात हे अगदी सत्य आहे.पण अशी वेळ येण अथवा या वेळेचा सामना करावा लागण म्हणजे संपुष्टात येण असं होतं नाही. जीवन म्हणजे अनिश्चिततेचा खेळ असतो . दैनंदिन जीवनात अनेक समस्या गुंतागुंत अडचणी निर्माण होण नैसर्गिक आहे क्रमप्राप्त आहे. त्याच बरोबर आपण ज्या क्षेत्रात ज्या ठिकाणी ज्या उंचीवर आहेत ती जागा उंची कधी कधी संकटात देखिल सापडते याच कारण त्या काळात आपली वेळ हि खराब असते.आपली वेळ खराब असल्याने आपले प्रयत्न यशात परिवर्तित होत नाही अशा वेळी आपण घाबारून जाण उचित नाही अथवा तणाव घेऊन स्वतःला डिप्रेशन स्थिती पर्यंत घेऊन जाणं हे देखील योग्य नाही.



आलेलं वादळ हे कधीच फार काळ थांबत नसत पण या भयाण वादळात आपल्याला फक्त खंबीरपणे उभा रहता आलं पाहिजे. वाईट वेळ असताना आपण प्रयत्न करण्या ऐवजी स्वतःला सावरलं पाहिजे आणि स्वतःला सावरलं कि मग आपोआपच अनुकूल वेळ निर्माण झाली कि आपल्या इच्छेनुसार घडामोडी घडणारच आहेत पण त्यापुर्वी आपण स्वतःला मजबूत ठेऊन उभा राहण आवश्यक असतं. वाईट वेळ ही कायम वास्तव्य करण्यासाठी अजिबात आलेली नसते.वेळेचा प्रभाव जगात कोणालाही टाळता येत नाही पण वेळ व्यवस्थित होण्याची वाट आपण नक्कीच पाहु शकतो आणि ज्या वेळी आपली वेळ आपल्याला अनुकूल असेल तेव्हा जगातील सगळ्या शक्ति आपल्या बाजूने उभा राहातात त्याच बरोबर नैसर्गिक शक्ति सुद्धा आपल्या बाजूने असतात म्हणून चिंता न करता तणाव न घेता आपली वेळ योग्य येई पर्यंत स्वतःला मैदानात खंबीरपणे ठेवता आलं पाहिजे आणि वाईट वेळेचा प्रभाव दुर होईपर्यंत स्वतःला आध्यात्मिक ज्ञानाच्या छत्री खाली सुरक्षित ठेवता येऊ शकत.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



# बाबाराव पाटील खडसे यांचे जिल्हा सीमेवर जंगी स्वागत

## निष्ठावंतात संचारला जल्लोष

आधुनिक केसरी

**वाशिम :** जिल्ह्यातील शरद पवार यांचे निष्ठावंत व विश्वासू सहकारी म्हणून ओळखले जाणारे बाबाराव पाटील खडसे यांची जिल्हाध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली आहे. ते आज मुंबई वरून वाशिमकडे येत असतांना, वाशिम जिल्ह्याच्या शेवटच्या टोकावर असलेल्या श्रीक्षेत्र लोणी बुद्रुक येथे त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात नुकत्याच झालेल्या भूकंपामुळे विस्कळीत झालेली पक्षाची ' घडी ' सुरळीत करण्यासाठी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी कंबर कसली असून, आपल्या निष्ठावंत व विश्वासू सहकाऱ्यांवर वेगवेगळी जबाबदारी टाकली आहे. त्या अनुषंगाने वाशिम जिल्ह्याची संपुर्ण जबाबदारी बाबाराव पाटील खडसे यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. मुंबई येथे पक्षाने दिलेली जबाबदारी स्वीकारून नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष खडसे पाटील वाशिमकडे येत असातांना नवचैतन्याचा जल्लोष संचारालेल्या निष्ठावंत कार्यकर्त्यांनी त्यांचे जंगी स्वागत केले.यावेळी भागवत मामा बोडखे, सुनिल मामा बोडखे, निलेश बोडखे, प्रदीप बोडखे, विनोद बोडखे, विपुल बोडखे, बाळु पाटील सरोदे, प्रमोद टकले, दिपक लोखंडे, संतोष फुळुंबरकर आदी सह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.



संत सखाराम महाराज यांच्या वास्तव्याने पावन झालेली पुण्यभूमी श्रीक्षेत्र लोणी बुद्रुक येथे झालेला सत्कार प्रेरणादायी आहे . संत सखाराम महाराजांचा आशिर्वाद आणि तुम्हां सर्व कार्यकर्त्यांची साथ आपले ध्येय पुर्ण करण्यास निश्चितच उपयुक्त ठरेल असा मला विश्वास आहे . . !

**बाबाराव पाटील खडसे, ( नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष )**

# आमच्या दु:खी 'प्राक्तनाची' कधी संपेल कहाणी... ?

## शेतीचं स्मशान झालं : हातावरची भाकरी हिरावली

आधुनिक केसरी



**भोकर:** अदिम काळापासून शेती आणि पाऊस यांच अतूट नात विणलेल आहे.. कुणाची नजर लागली माहिती नाही.. काळ्या मातीशी एकरूप झालेल्या कष्टाळू शेतक-यावर..एकामागून एक संकटाची मालीका सूरू आहे..ज्या वरूण राजावर निष्ठा ठेवली तो हि आता "निष्ठूर" झालाय.. नूकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे शेती- शिवाराला" मरणकळा" आली.. गलीतग्रात झालेला शेतकरी पूरता खचला आहे.. हे प्रजन्य देवता.. आमच्या दू:खी "प्राक्तनाची" कधी संपेल कहाणी..असा सवाल करतांना ऊरी हूंदका दाटुन येतो आहे. कृषी प्रधान देशातील शेतकऱ्यांच्या घरातील लादणीत धनधान्य काठोकाठ भरलेल असायच.शेतात आणि घरीदारी लक्ष्मीची पावल सदैव दूडूदूडू धावायची. शेतीमाला हमीभाव आणि योग्यबाजार पेठ लाभल्याने शेती सपंन्न देशाची आर्थिक बाजू बळकट होती. हळूहळू काळमान बदलत गेला आणि कृषी प्रधान देशाला" नजर "लागली अन् सार चित्र ऊलट फीरू लागल आहे.निसर्गातील तीन श्रूतुचे सोहळे ठरल्या प्रमाणे होत असत आता श्रूतूनी आपली "कुस" बदलली आहे. मागील आठदहा वर्षांपासून निसर्ग "लहरी" बनल्याने त्याचा शेती ऊत्पादनावर विपरित परिणाम होतो आहे. खरिप आणि रब्बी हंगामातील पिकावर संक्रांत आली आहे. बाजारपेठेत मालाला हमीभाव मिळत नाही. योग्य बाजारपेठ नसल्याने अव्वाच्यासव्वा दरात माल द्यावा लागतो.यात व्यापा-याची चांदी होत असून शेतकरी आर्थिक संकटात सापडतो आहे. "ऊत्तम "शेती असा पांयडा पडला होता आता तो पांयडा धुळीस मिळाल्याने शेती व्यवसाय अडचणीत आला आहे.तालूक्यात चाळीस ते पन्नास हेक्टर क्षेत्रावर खरिपाची पेरणी केली जाते. निसर्गाची योग्य साथ मिळत नसल्याने शेतकरी दरवर्षी चिंतेत असतो.कधी कोरडा तर कधी ओला दूष्काळ नशिबी येतो आहे. यंदातर पावसाने कहरच केली. शेती शिवाराला अक्षरशा तळ्याच स्वरूप प्राप्त झाले आहे.कोवळी पिके खरडुन गेल्याने शेतीच मातेर झाल आहे. अनेक गावात पुराचे पाणी शिरल्याने ग्रामस्थांना रात्र जागून काढावी लागली.घराची पडझड झाल्याने संसार उघड्यावर आले आहेत.काहि जनावरे जागीच दगावली.आता भविष्यात कूणाच्या भरवशावर जगाव असा प्रश्न उपस्थित झाला आहे.नूकसानग्रस्त भागाची पाहणी करून पंचनामे तयार करण्यात शासन मशगुल झाला आहे. शासन तूटपुंजी मदत करून पाठ थोपटून घेत फूशारकी मारते. या मदतीवर कशाची भरपाई होईल याची चिंता शेतऱ्यांना लागली आहे.

# जयपूर-मुंबई ट्रेन गोळीबारातील तीनपैकी दोन प्रवाशांची ओळख पटली


आधुनिक केसरी

**मुंबई :** जयपूर-मुंबई एक्सप्रेसमध्ये आज पहाटेच्या सुमारास गोळीबाराची घटना घडली आहे. या गोळीबारात एका आरपीएफच्या एएसआयसह तीन प्रवाशांचा मृत्यू झाला आहे. या तीन प्रवाशांपैकी दोघांची ओळख पटवण्यास पोलिसांना यश आले आहे. कादर भानपुरावाला आणि असगर अशी दोघांची नावे आहेत. कादर हे नालासोपारा येथील रहिवासी आहेत, तर असगर हे मूळचे बिहारमधील रहिवासी आहेत. गोळीबारात मृत्यू झाल्याची बातमी कळताच दोघांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. घटनेची माहिती मिळताच रुग्णालयात धाव घेत नातेवाईकांनी एकच टाहो फोडला. आरोपीला कठोर शिक्षा देण्याची मागणी नातेवाईक करत आहेत. कादर पुनावाला हे नालासोपारा पूर्वेकडील आचोळे रोडवरील तेज प्रतिमा इमारतीत आपल्या कुटुंबासह राहतात. कादर हे मोहरमनिमित्त जयपूरला नातेवाईकाकडे गेले होते. तेथून जयपूर-मुंबई एक्सप्रेसने मुंबईला परतत असतानाच ही घटना घडली. विशेष म्हणजे काही वेळात ते आपल्या इच्छित स्थानकाजवळ पोहचणार इतक्यातही घटना घडली. घटनेची माहिती मिळताच कादर यांच्या कुटुंबीय आणि शेजाऱ्यांना धक्का बसला. कुटुंबीयांनी तात्काळ शताब्दी रुग्णालयाकडे धाव घेतली. दुसरा मयत असगर हा मूळचा बिहारमधील मधुबनी येथील असून, कामाच्या शोधात तो जयपूरहून मुंबईला येत होते. असगर यांना चार मुलं आहेत. त्यांची आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने कामानिमित्त ते मुंबईत येत होते.




महाराष्ट्र Business Katta









# अण्णा भाऊंच्या क्रांतीची मशाल पेटती ठेवू !



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**काही माणसं गावकुसाबाहेर जन्मतात आणि तीच माणसं पुढे चालून गाव, शहर आणि देशाच्या जागृतीची केंद्रस्थानं बनतात! त्यामुळेच "कुठेही हिऱ्याची खान नसून हिरा कोळशाच्या खाणीतच जन्माला येतो" असं मोठ्या सन्मानाने म्हटलं जातं! कोळशाच्या खाणीतून निघालेले हे हिरे नंतर देश आणि उभ्या जगाचे मानदंड बनतात ! ही सर्वच विशेषणे ज्यांना मोठ्या सन्मानाने शोभायमान करतात असे भारत मातेचे सुपुत्र, महापुरुष, साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे होत.**

जेमतेम 49 वर्षांचे अल्पायुष्य लाभलेले अण्णाभाऊ साठे म्हणजे लेखक, कवी, व्याख्याते, समाजसुधारक, देशभक्त आणि क्रांतिकारक हे सर्वकाळ प्रेरणा बनून राहिले आहेत! हजारो वर्षापासून उपेक्षित-वंचित मातंग कुटुंबात जन्मलेल्या अण्णाभाऊंच्या पदरी उपजतच अठराविश्व दारिद्र्य आले! भारतीय पारतंत्र्याचा काळ आणि रूढीपरंपरांनी कुजलेल्या समाजात अण्णाभाऊ साठे 1 ऑगस्ट 1920 रोजी जन्मले. वर्णव्यवस्थेचे जोखड, अत्यंत गरिबी परिणामी अण्णा भाऊ केवळ दीड दिवस शाळेत जाऊ शकले. त्यांची जडणघडण मात्र स्वातंत्र्याच्या विरश्रीने झपाटलेल्या पोवाडे, भाषणे आणि विविध गीतांनी समृद्ध बनत गेली. खूप कमी वयातच कामाला जायची वेळ आल्यामुळे अण्णा भाऊ आपले मूळ गाव सोडून मुंबईला गेले. तिथे सूतगिरणीमध्ये काम करतांना ऐन तारुण्यात मजुरांच्या व्यथा वेदना भोगल्या आणि भोवतालची गोर-गरीब जनता कशी नरक यातना भोगत आ हे( ? ) याचे अत्यंत जवळून निरीक्षण झाले. आपल्या भोवतालची परिस्थितीच माणसाला लिहायला उद्युक्त करत असते, या न्यायाने एकीकडे अण्णाभाऊ भारतीय स्वातंत्र्याच्या रणसंग्राम आणि दुसरीकडे अठराविश्व दारिद्र्य हा त्यांच्या जीवन-चिंतनाचा विषय झाला ! अठरा ते बावीस वयात त्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर आदि सर्वच राष्ट्रीय चळवळीतील लोकांचे विचार एकूण ते प्रभावित झाले. त्याच काळात कम्युनिस्ट विचारसरणीचे कॉ. श्रीपाद डांगे, दत्ता गवाणकर, शाहीर अमर शेख यांच्या कम्युनिस्ट विचारसरणीने प्रभावित होऊन अण्णाभाऊ "लाल बावटा पथका"मध्ये सामील झाले. अनेक देशभक्तीपर गीते, पोवाडे आणि भाषणांनी अण्णा प्रभावित झाले आणि त्यातूनच त्यांना लिहायची प्रेरणा मिळाली. 15ऑगस्ट 1947 साली भारताला स्वातंत्र्य मिळाले, मात्र मुंबईचा प्रश्न तसाच शिल्लक राहीला. परिणामी 16 ऑगस्ट 1947 रोजी "संयुक्त महाराष्ट्र चळवळी"ने उग्र रूप धारण केले आणि त्या अंतर्गत मुंबईत 20 हजार लोकांचा "ए आझादी झुटी है, देश कि जनता भूखी है!" अशा घोषणा देत विराट मोर्चा निघाला. त्यात अण्णाभाऊ अग्रस्थानी होते. याच संयुक्त महाराष्ट्र चळवळीत अण्णाभाऊंनी "महाराष्ट्राची परंपरा" हा पोवाडा लिहिला. अत्यंत कमी काळात या पोवाडयाला प्रचंड प्रसिद्धी मिळाली. याचा परिणाम असा झाला कि; अण्णाभाऊ आपले सूतगिरणीतील काम सोडून लोकनाट्यात काम करू लागले. तिथेच त्यांना नाटकाचा वग लिहायची संधी मिळाली आणि त्यानंतर मात्र अण्णाभाऊंनी मागे वळून बघितलेच नाही!

आपल्या जेमतेम, खडतर परिस्थितीत आणि अत्यंत कमी कालावधीत अण्णाभाऊंनी लेखन कार्यासाठी अक्षरशः स्वतःला झोकून दिले. याचा परिपाक म्हणजे अण्णाभाऊंच्या लेखणीतून 35 पेक्षा जास्त कादंबऱ्या, 8 लोकनाट्ये, 10 कथासंग्रह, 3 नाटके, अनेक पोवाडे, लावण्या आणि विशेष म्हणजे 'माझा रशियाचा प्रवास' हे प्रवास वर्णन लिहून मराठी वाङ्मयात आपली वेगळी ओळख निर्माण केली. या सर्वच बाबींचा कळस म्हणजे अण्णाभाऊ साठेंच्या 7 पेक्षा जास्त कादंबऱ्यावर मराठी चित्रपट निर्माण झाले. अत्यंत कमी काळात अण्णाभाऊंचे वाङ्मय



हे उपेक्षित-वंचित-शोषित लोकांचा आवाज बनले. फकीरा, वारणेचा वाघ, रत्ना, रूपा, वैजायंता, वैर या कादंबऱ्यानी लेखन क्षेत्रात आपला मानदंड प्रस्थापित केला. आज सुद्धा त्यांच्या तोडीच्या, धावत्या वर्णनाच्या आणि हुबेहूब चित्रण करणाऱ्या कादंबऱ्या मराठी साहित्यात दुर्मिळच! त्यांच्या कादंबरीतील गरिबी, दारिद्र्य आणि संघर्ष करणाऱ्या उपेक्षित-वंचित लोकांचा जीवनवृतांत वाचाकांना सहजतेने अंतर्मुख करून जातो. अण्णाभाऊ हे भाषण आणि गायनातही मोठे प्रसिद्ध होते. त्यांच्या पहाडी आवाजात गायिलेला पोवाडा ऐकला कि; श्रोत्यांच्या अंगावर रोमांच उभे राहायचे ! ते प्रसिद्ध लोककलावंत म्हणून गाजलेले असतांना 1958 साली झालेल्या पहिल्या दलित साहित्य संमेलनात "पृथ्वी ही शेषनागाच्या मस्तकावर तरलेली नसून दलित व कामगार लोकांच्या तळहातावर तरलेली आहे" असे क्रांतिकारी शब्द काढून येथील प्रस्थापितांना विचार प्रवृत्त केले. त्यांच्या "माझी मैना गावावर राहिली" सारख्या काही लावण्या आजही तेव्हढ्याच लोकप्रिय असून लोकांच्या चिंतनाचा विषय होत असतात. त्यांचे लेखन, गायन, पोवाडे आणि भाषण ही नेहमीच श्रोते आणि वाचकांना एक पर्वणीच असते !

आज आपण आण्णाभाऊ साठे यांची शतकोत्तर जयंती साजरी करत असतांना आणि भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करत असतांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर निर्वानदिनी त्यांनीच लिहिलेले

**जग बदल घालूनी घाव ।सांगुनी गेले मज भीमराव ॥धृ ॥**
**गुलामगिरीच्या या चिखलात ।रुतुन बसला का ऐरावत ॥**
**अंग झाडूनी निघ बाहेरी ।घे बिनीवरती घाव ॥**

हे क्रांतिकारी गीत आजही मार्गदर्शक आणि सामान्य माणसांना पाथगामी आहे! तेराव्या शतकांत संत तुकारामांनी आपल्या अभंगांद्वारे सामाजिक क्रांतीचे रणशिंग फुंकले असतांना विसाव्या शतकांतील या तुकारामाने ( अण्णा भाऊ साठे ) त्यांचाच वसा आणि वारसा पुढे चालवतांना सामान्य माणसाला जागृत करण्याचे, चेतवण्याचे महत्कार्य केलेले आढळून येते.

सांप्रतकाळी समाज शिक्षित असतांना आणि सर्वत्र साधनांची रेलचेल असतांना अण्णा भाऊ साठें सारखे लेखन आज होतांना दिसत नाही ही मोठी चिंतेची बाब आहे! सर्व सुविधा उपलब्ध असतांना माणसं लिहित नाहीत. तरुणांना मिडिया नावाच्या अफूने धुंद केले आहे! उच्च शिक्षित शिक्षक-प्राध्यापक लिहायला-वाचायला तयार नाही. देशात अनेक प्रकारच्या अशोभनीय, मानवतेला कलंक लावणाऱ्या घटना घडत असतांना आज कुणीही क्रांतीची, उठावाची, संघर्ष आणि मोर्चाची भाषा करत नाही! त्यावर रोखठोक लिहून सरकारला सवाल विचारात नाही. विवेकानंद, टिळक, गांधी, बाबासाहेब आणि अण्णाभाऊ यांचे लाखो अनुयायी असतांना अत्यल्प प्रमाणात त्यांच्या लेखन-क्रांतीची सेवा घडून येते आहे! खरंच जर आपल्याला अण्णाभाऊ यांच्या घावाची काळजी असेल आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मार्गावर चालायचे असेल तर येथील प्रस्थापित, धनदांडग्या, शासनकर्त्या मस्तवाल लोकांच्या विरोधात मोठा लढा उभारण्याची वेळ येऊन ठेपली आहे. खा.जा.ऊ.च्या नावाखाली देशातील शासकीय आस्थापनांचे खाजगीकरण रोखण्यासाठी मोठा लढा उभारावा लागेल! असे झाले नाही तर अण्णाभाऊ साठे यांनी पेरलेली क्रांतीची बीजे कुचकामी ठरतील आणि देश पुन्हा श्रीमंतांच्या दावणीला बांधला जाईल! तेंव्हा, कोणत्याही महापुरुषांची जयंती किंवा पुण्यतिथी साजरी करतांना केवळ प्रतिमा पूजन, स्टेटस, स्टोरी किंवा मिडीयावर एखादी पोस्ट करून चालणार नाही, तर सर्वच लोकांनी येथील व्यवस्थेला जागे करण्यासाठी शिव-फुले-शाहू-आंबेडकर-अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांची कास धरावी लागेल! असे परिवर्तन होत राहील्यास आपला देश जात-धर्म-पंथ विरहित होऊन सर्व जनता आनंदाने, गुण्यागोविंदाने नांदू लागेल! धन्यवाद!

# साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे



मल्हारराव डोणगांवकर
संपर्क क्र. ९६३७९३७५७९

आधुनिक केसरी

**जग बदल घालुणी घाव ।सांगून गेले मजला भिमराव ।। या काव्याद्वारे अख्ख्या जगाला मोलाचा संदेश व प्रेरणा देणारे जगद्विख्यात अण्णाभाऊ साठेंना जयंतीनिमित्त प्रथमतः कोटी-कोटी प्रणाम. अण्णा भाऊंचा जन्म १ ऑगस्ट १९२० रोजी वारणेकाठी वाटेगांव येथे झाला. तत्कालिन परिस्थितीत त्या काळात अर्थात आषाढ महिन्यात मर्या आई, लक्ष्मी आई, म्हसोबा, मांगीरबाबा अशा अनेक देवतांच्या यात्रा-जत्रा भरत. तेंव्हा या दैवतांच्या नावे नवस बोलायचे.**

नवसाच्या नावाखाली देवी-देवतांना कोंबड्या, बकरे यांचे बळी द्यायचे. रस्त्या-रस्त्यावर पोतराजांचे थौमान असायचे. पोतराज आला, पोतराज आला या भाकड-गीताद्वारे जनसामान्य हुरळून जायचा. समाज अधोगतीला जातोय, नको त्या गेरमार्गाने गुरफटल्या जातोय, अंधारात चाचफडतोय यांना या दलदलीतून कोण बाहेर काढणार ? यांना प्रेरणा कशी मिळणार ? यासाठी अण्णा भाऊंनी रणशिंग फुंकले. आटापीटा करुन जीवाचे रान केले. आज असे म्हटले जातेय की, शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही. जर नाही शिकला तर कायमचा हुकला. पण अण्णाभाऊंनी या विपरीत, कठिण परिस्थितीवर मात करुन अवघ्या दिव दिवस शाळेत गेले व रातदिन न शिकता, सवरता अजरामर साहित्य हे भारताला व अख्ख्या जगाला देऊन. म्हणूनच तर जगविख्यात साहित्यरत्न ही उपाधी अण्णा भाऊंना दिली. वरच्या वर्गातील समाजव्यवस्था ही इतर समाजाला खालच्या थराची समजून किड्या-मुंग्या समान किंमत देत होती. तेंव्हा व्यवस्थेला हादरा देऊन मुठमाती देऊन कायमचे वठणीवर, ठिकाणावर आणण्यासाठी प्रसंगी चळवळीत भाग घेतला व युध्दही केले. त्यांनी कधीही अहंकार व दुजाभाव केला नाही. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत गाजलेल्या अण्णा भाऊंना रशियन राष्ट्राध्यक्ष यांनी रशियाला आमंत्रित करुन मानाचा सन्मान दिला. तेंव्हा रशियाचा व भारताचा प्रमुख दुवा साधणारा भारतातील एकमेव मातंग म्हणून अभिमानाने ऊर भरुन येतो.

खर्या अर्थाने साहित्यिक कसे असावेत योच अतुलनीय उदहरण म्हणजे अण्णा भाऊंचे द्यावे लागेल. अण्णाभाऊ हे माणसा माणसावर प्रेम कसे करावे यावर भर देणारे प्रख्यात साहित्यिक होते. बिचारी मायबाप जनता दलदल ठोकरा खाऊन उपेक्षित जीवन जगत होती. टिचभर कापडअंगावर नसायचे, पोटात पोटभर भाकर नसायची या वास्तववादी परिस्थितीवर आसूड ओढणारे साहित्यिक म्हणजे अण्णाभाऊ साठे दुःखी, भुकी, कर्जबाजारी, बहुजनांचे दुःखदायी चित्रण अण्णाभाऊ हे तितक्याच प्रामाणिकतेने रेखांटन करायचे. ते असेही म्हणत की, माझी जीवनावर निष्ठा असून मला माणसे फार आवडतात, माणसाच्या बळावर हे जग चालतं. जो कलावंत जनतेची कदर करतो त्याची नता कदर करते. अशा या थोर युग पुरुष अण्णाभाऊ साठे यांचे जीवनातील केलेले कार्य व घटना खालील प्रमाणे. १ ) १९४१-४२ मध्ये अण्णा भाऊंना मुलगा झाला. त्याचे नांव मधुकर ठेवले. २ ) इ.स. १९४२ मध्ये लोकसाहित्य, युगांबर, लोकयुध्द या साप्ताहिकात वार्ताहार




म्हणून काम केले. ३ ) १९४४ साली लाल बावटा या कलापथकाची निर्मिती केली. ४ ) इ.स. १९४५ ते १९५५ ला अण्णा भाऊंच्या स्थैर्याचा काळ होता, त्यांनी चिंतन-मनन करुन प्रचंड मोठया प्रमाणात लिखान केले. ५ ) १९४९ मध्ये अण्णा भाऊंनी मशाल साप्ताहिकातून दिवाळी ही पहिली कथा लिहिली.

६ ) १९६१ साली अण्णा भाऊ रशियाच्या दौर्यावर गेले व अण्णा भाऊ साठे हे जागतिक किर्तीचे कलाकार, कादंबरीकार म्हणून उदयास आले.

७ ) अण्णा भाऊवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचा पगडा होता. अण्णा भाऊ कम्युनिष्ठ विचारांचे होते. ८ ) फकिरा ही कादंबरी डॉ. बाबासाहेबांच्या झुंजार लेखणीस अर्पण केली.

९ ) अण्णा भाऊ साठे यांच्या प्रकाशित कथा संग्रहाचे नांव कारबांधा, कजारी, चिरानगरीची भूत, निखारा, नवती, पिसाळेला माणूस, आबी, फरारी, असे २० कथा संग्रह त्यांचे नामे आहेत.

१० ) तमाशा-बेकायदेशीर बुलंदर बडवे, कलंत्री, खापर्या चोर, अकलेची गोष्ट, शेटजीचे इलेक्शन, पुढारी मिळाला, मुक मिरवणूक, माझी मुंबई इत्यादी. ११ ) पोवाडे - नानकीन, नागरापुढे, सॅलिनग्राडचा पोवाडा, कर्लिनचा पोवाडा, बंगालची हाक, पंजाब दिल्लीचा दंगा, तेलंगणाचा संग्राम, महाराष्ट्राची परंपरा, मुंबईचा कामगार, काळया बाजाराचा पोवाडा इत्यादी. १२ )कादंबर्या - आघात, अहंकार, अग्निदिव्य, कुरुप चित्र, फुलपाखरु, वारनेच्या खोर्यात, रुपा, सव्वासी तास, गुलाम डोळे, मुरडीत राधा चाले, बसलेल्या बंदुका, जिवंत काडतुसे, चंदन, मथुरा, मास्तर, चिखलातील कमळ, अळगुंज रानगंगा इत्यादी ३ पेक्षा जास्त कादंबर्या लिखान केले. अण्णा भाऊंनी आपल्या संपूर्ण आयुष्यात दोन गोष्टींचा कायमस्वरुपी त्याग केला. त्या म्हणजे एक श्रीमंत, बलदंड वर्गांकडून होणारी गरीबांची पिळवणूक व शोषण व दुसरे म्हणजे अस्पृश्य बांधवांची होणारी धार्मिक व सामाजिक ओढाताण. या विषारी वृक्षवल्लीतून या समाजाला बाहेर काढलेच पाहिजे या निश्चिय, निर्धाराने अण्णा भाऊंनी आपल्या लेखनीने सतत कोरडे ओढले. जनसामान्यांच्या विश्वासासाठी प्रखर प्रहार केले. अशा या थोर साहित्यरत्नाने गरीबीच्या व हलाखीच्या सिस्थितूनही एवढे मोठे साहित्यकृती निर्माण करुन भारताचे नाव रशियात व सातासमुद्रापार नेऊन अख्ख्या जगात नावलौकिक मिळवून दिला. करीता जगविख्यात साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे महान असे गर्वाने, स्वाभिमानाने व अभिमानाने म्हणावे लागेल. अण्णा भाऊ साठे जयंती निमित्त कोटी-कोटी प्रणाम.

# साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र. : ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**आज १ ऑगस्ट, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची आज १०३ वि जयंती. मराठी मातीत जन्मलेलं एक अनमोल रत्न म्हणजे अण्णाभाऊ साठे. अण्णाभाऊ साठे यांचा जन्म १ ऑगस्ट १९२० रोजी सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील वाटेगाव येथे झाला.**

त्यांच्या वडिलांचे नाव शिधोजी साठे तर आईचे नाव वालुबाई. त्यांचे मूळ नाव तुकाराम असे होते. घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची व हलाखीची त्यामुळे त्यांना शिक्षण घेता आले नाही. अण्णाभाऊ केवळ दीड दिवस शाळेत गेले बाकीचे सर्व शिक्षण मुंबईच्या झोपडपट्टीत झाले. मुंबईत सुरवातीला त्यांनी मिळेल ती कामे केली नंतर त्यांना मुंबईतील गिरणीमध्ये झाडूवाल्याची नोकरी मिळाली. तिथेच त्यांना कामगारांच्या कष्टमय, दुःखमय जीवनाचे दर्शन झाले. कामगारांचे, संप, मोर्चे पाहून त्यांनी त्यांचा लढाऊपणाही अनुभवला. १९३६ साली कामगार नेते श्रीपाद अमृत डांगे यांच्या विचारांनी प्रभावित होऊन ते कम्युनिस्ट पक्षाचे कार्यकर्ते बनले. मुंबईत त्यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे ऐकली. डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी ते इतके प्रभावीत झाले की त्यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकरांना आपले गुरू मानले. वडीलांच्या निधनानंतर घरची जबाबदारी त्यांच्यावर पडल्यानंतर ते पुन्हा गावी आले. तिथे बापू साठे या त्यांच्या चुलतभावाच्या तमाशा फडात ते काम करू लागले. १९४२ च्या आंदोलनात सहभागी झाल्याने त्यांच्यावर पोलिसांनी पकड वारंट काढले. पोलिसांना चुकवत ते पुन्हा मुंबईला आले. मुंबईत आल्यावर लोकशाहीर म्हणून ते नावारूपास आले. १९४४ साली शाहीर अमर शेख व गव्हाणकर यांच्या मदतीने लाल बावटा या कलापथकाची त्यांनी स्थापना केली. पुढे त्यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीत भाग घेतला. त्यांच्या शाहिरीत लावणी, पोवाडे, लोकनाट्ये यांचा समावेश असे. महाराष्ट्राची परंपरा, मुंबई कोणाची ? ही त्यांनी लिहिलेली लोकनाट्ये खूप गाजली. अकलेची गोष्ट, देशभक्त घोटाळे, बेकायदेशीर, पुढारी मिळाला यासारखी त्यांनी लिहिलेली अनेक वगनाट्य लोकप्रिय झाली. अण्णाभाऊंच्या साहित्यात कथा कादंबरीची निर्मिती ठळकपणे नजरेत भरते. जिवंत काडतुसे, आबी, खुलंवाडी, बरबाद्या कंजारी, चिरागनगरची भुते, कृष्णाकाठच्या कथा हे त्यांनी लिहिलेले कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. अण्णाभाऊंनी ३५ कादंबऱ्या लिहिल्या. चित्रा, फकिरा, वारणेचा वाघ, माकडीचा माळ, रानगंगा, चिखलातील कमळ, वैजयंता या त्यांनी लिहिलेल्या कादंबऱ्या खूप गाजल्या. फकिरा या त्यांच्या कादंबरीला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला. फकिरा ही आजही सर्वाधिक विकली जाणारी कादंबरी आहे. अनेक विद्यापीठात या कादंबरीचा अभ्यासक्रमात समावेश आहे. जो व्यक्ती अवघे दीड दिवस शाळेत गेला त्या व्यक्तीची साहित्य संपदा विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी ठेवण्यात आली हा आधुनिक युगातील एक चमत्कार आहे. म्हणूनच अण्णाभाऊ हे आधुनिक युगातील साहित्यरत्न आहे. त्यांच्या काही कादंबऱ्यांवर चित्रपटही निघाले. उपेक्षित गुन्हेगार म्हणून कलंकित ठरवले गेलेले दलित आणि श्रमिक यांच्या समृद्धीचे स्वप्न अण्णाभाऊ पाहत होते. डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या लढाऊ आणि विमोचक विचारांचे संस्कार त्यांच्या मनावर खोलवर झालेले होते. जग बदल घालुनी घाव! सांगून गेले मज भीमराव! हे त्यांचे गीत खूप गाजले. माझी मैना गावाकडं राहिली... ही त्यांची लावणी तर अविस्मरणीय आहे. पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरली नसून ती दलितांच्या तळहातावर तरलेली आहे असे ते नेहमी म्हणत. मानवी जीवनातील संघर्ष, नाट्य, दुःख, दारिद्र्य त्यांच्या साहित्यातून प्रकट होते. जगातील सत्तावीस भाषांमध्ये अण्णाभाऊंच्या साहित्याचे भाषांतर झाले आहे. १९५७ साली झालेल्या दलित साहित्य संमेलनाचे ते स्वागताध्यक्ष होते. महाराष्ट्रातील विद्यापीठांत अण्णाभाऊंवर अकरा प्रबंध प्रसिद्ध केले गेले आहेत. पुणे विद्यापीठात त्यांच्या सन्मानार्थ अण्णाभाऊ साठे अध्यासन सुरू करण्यात आले आहे. असा हा पदादलितांच्या जीवनावर वास्तव लिहिणारा साहित्यरत्न १८ जुलै १९६९ रोजी कालवश झाला. आज त्यांची १०३ वि जयंती त्यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

# अर्धवट मैत्री सोडून का गेला प्रशांत जोशी ?



राम कुलकर्णी,
भाजपा राज्य प्रवक्ता
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

**1984 चा काळ अंबाजोगाई शहरात अकरावी वर्गात शिक्षणासाठी ग्रामीण भागातुन मी आलो. चांगल्या घरचा शहरी मुलगा म्हणून त्याचे आकर्षण मला पहिल्याच नजरेत झाले. आखिल भारतीय विद्यार्थी परिषद संघटनेच्या माध्यमातुन जवळीक वाढली. अकरावी आणि बारावी एकाच वर्गात आम्ही शिक्षण घेत होतोत. सोबत दत्ता आंबेकर आणि ज्याला पिट्या म्हणून बोलायचो तो अनंत कुलकर्णी. मैत्रीचे नाते रक्ताच्या नात्यात झाले. तब्बल तीन वर्षे प्रशांतसोबतचा सहवास मैत्रीचे पुस्तक मागे पालटून पाहिल्यानंतर खुप काही आठवणी, प्रा.अविनाश जोशी परिषदेचे शहराध्यक्ष, पुण्याचा रविंद्र घोगरे तर सोबत उन्मेष मातेकर, प्रमोद कुलकर्णी नावाचा पुर्णवेळ तेव्हाचा कार्यकर्ता.**

निमित्त परिषदेचे पण प्रशांतसोबतचं नातं ज्याची आठवण आज काढू शकत नाहीत. असा जीवाभावाचा मित्र ज्याच्या जीवनाचा प्रवास सुरूळीत असताना अचानक आपल्यातुन निघुन जातो. हे दुःख सहन न होण्यापलीकडचं परळीसारख्या शहरात केलेली पत्रकारिता त्यातला सकारात्मक गुण हा खऱ्या अर्थाने त्याच्या जाण्यानंतर सहवासातल्या लोकांना आठवणीच्या वेदना त्यातुन एक माणुस म्हणुन प्रशांत कसा होता ?हे मरणोत्तर कळुन चुकते.

बीड जिल्ह्यातील जेष्ठ पत्रकार म्हणून मी त्याच्याकडे लोक बघायचे. परळीच्या दै.मराठवाडा साथीमध्ये विविध पदांवर काम करताना बियाणी कुटुंबियांसोबत त्याची वाढलेली जवळीक आणि त्याने दैनिकावर केलेले प्रेम बरंच काही सांगुन जाते. पत्रकारीता सकारात्मक करावी आणि कुणीही माझा शत्रु नाही हा आदर्श त्याच्याकडे पाहिल्यानंतर इतरांनी घेण्यासारखाच.अलीकडे संसार व्यापामुळे त्याचा संपर्क कमी झाला. पण जो काळ तीन-चार वर्षाचा मला मिळाला. त्यातुन एक गोष्ट निश्चित म्हणावी लागेल की, खेड्यातला मी पण प्रशांतच्या सहवासाने शहराचा झालो. त्याने कधीच आम्हाला दुरावा दिला नाही. चार पत्र्याच्या खोलीत शिक्षणासाठी मी जेव्हा भट गल्लीत रहायचो. सोबत प्रा. एस.पी. कुलकर्णी( मोठा भाऊ )हाताने जेव्हा स्वयंपाक करायचो तेव्हा हाच प्रशांत दिवसागणिक एकदा तरी आईकडून डब्बा घेवुन यायचा. अभ्यासासाठी त्याच्याकडे मुक्कामी रहायचो. आंबेकर, पिट्या मग त्याने केलेला रात्री चहा पण त्याला जुने गाणे मुकेश, मोहम्मद रफी, किशोरकुमार खुप आवडायचे. अभ्यास करताना टेप लावल्याशिवाय त्याला अभ्यास करता येतच नव्हता. असंख्य आठवणी त्याच्यासोबतच्या आहेत. गावाकडे अगदी 50 किमी सायकलवर अनेकदा आम्ही आलो. माझे वडील जेव्हा आजारी पडले त्यावेळी अंबाजोगाई शहरात प्रशांतने स्वतःच्या घरी एक महिना आमचा सांभाळ केला. हे दायित्व नजरेआड कधीच होवु शकत नाही. मैत्री जीवाभावाची पण मध्येच तो शिक्षण सोडून आजच्या संभाजीनगरला एका कंपनीत नोकरीसाठी गेला. प्रा.अविनाश जोशी यांनी आपल्या नातेवाईकांकडे त्याला संधी दिली होती. दोन-तीन वर्षे तिथे काम केल्यानंतर परत अंबाजोगाईत स्थायिक झाला. हळुवार आमच्यासोबत पत्रकारितेत पदार्पण केलं आणि हे करत असताना स्व.गोपीनाथराव मुंडे यांच्या हाताखाली स्विय सहाय्यक म्हणुन देखील परळीत काही वर्षे काम केलं. इथे त्याने पत्रकारितेला मुर्त रूप देवुन संसार जीवन स्थिरावलं. धडपड लहानपणापासून त्याच्या अंगात होती. अनेक वर्तमानपत्रामध्ये काम करताना सोमेश्वर एक्सप्रेस असेल किंवा साथी दैनिकात त्याने केलेलं कार्य परळीकर कधीच विसरू शकत नाहीत. आमच्यापेक्षा परळीकरांचं त्याचा असलेला सहवास विविध क्षेत्रातली मैत्री वारकरी संप्रदाय, शिक्षण, सांस्कृतिक आणि राजकिय सर्व स्थळी त्याचा सहवास. अक्षर त्याचं मोत्याप्रमाणे होतं. शब्दांची फेक, त्याचे अलंकार, त्यातून सुत्रसंचालन हे परळीतले सद्गुण खुपच ज्याचा चेहरा डोळ्यासमोरून जात नाही. त्या शहरात माणसं जोडण्याचं काम त्याने केलं. ओळख झाली की माणुस टिकला आणि वर्षानुवर्षे तो पॉकीटात ठेवला असा त्याचा स्वभाव होता. अनेक संकटं जीवनात आली. अगदी संसारिक जीवनात देखील संघर्ष केला. सुखाची वाट त्याला सापडली



नाही पण कधीही आपल्या चेहऱ्यावर त्याने ताणतणाव दिसु दिला नाही. प्रविण आणि प्रसन्ना दोन भावाच्या पाठीमागे खंबीरपणे उभा रहाणारा भाऊ म्हणजे प्रशांत. वडिलानंतर मातृशक्तीच्या मार्गदर्शनाखाली त्याचं आयुष्य सुरूळीत चालु झालं. त्याच्या घरात आई त्याला राजा म्हणत असत. तो मनाने खरोखरच राजा होता. स्वतःसाठी न जगलेला पत्रकार म्हणजे प्रशांत अस वर्णन करावंच लागेल. कुठलाही रूबाब नाही. जगण्याचा साधेपणा हा आत्मानंदी उत्सव वाढवणारा होता. अंबाजोगाई शहरात पत्रकारितेच्या माध्यमातून अनेकांचे संबंध त्याचे जवळचे आले. स्व.गोपीनाथराव मुंडे, स्व.विमलताई मुंदडा यांच्याशी कौटुंबिक जिव्हाळा होता. विविध पक्षाच्या नेते, कार्यकर्ते यांच्यासोबत देखील त्याचं नातं अतुट असायचं. त्याचा एक सद्गुण तो म्हणजे सकारात्मक पत्रकारिता. मैत्री दिनाच्या शुभेच्छा देत असताना असा जीवाभावाचा मित्र जेव्हा याच दिवशी सोडून जातो ती मैत्री कुठली ? किंवा मग आमचा काय गुन्हा होता ? असे अनेक प्रश्न मनाला पडतात. पण नियत कुणाला सोडत नाही. पण एवढी निष्ठुर का असते ? हे देखील तितकंच खरं. प्रशांतची आई ज्यांचं वय आज ऐंशी पार. पण ज्या पोटच्या गोळ्याने आयुष्यभर राजा म्हणून आवाज दिला, गोंजारलं तो राजा अचानक तिच्या नजरेआड होतो.

हे केवढं दुःख याची कल्पना करू शकत नाहीत. त्याच्या जीवनात पत्नीने दिलेली खंबीर साथ आणि केलेला संघर्ष कमालीचा. पण आज किती आभाळ वहिनीवर कोसळलं ? असो. परमेश्वर या घराला आणि प्रशांतच्या कुटुंबियाला दुःखातुन सावरण्याची निश्चितच शक्ती देईल. माता योगेश्वरीच्या चरणी हीच प्रार्थना की प्रशांतचं संपुर्ण कुटुंब दुःखद घटनेतुन बाहेर पडण्यासाठी ताकद मिळु दे. खरं तर त्याला राजकपुरच दोस्त दोस्त ना रहा हे गाणं खुप आवडायचं. त्यापेक्षाही सजन रे झुठ मत बोलो, खुदा के पास जाना है असे गाणे प्रशांतच्या संगतीमुळेच मला कानावर पडले. राष्ट्रभक्ती खरं तर त्याच्या अंगी लहानपणापासून होती. स्व.अटलबिहारी वाजपेयी यांचा आदर्श डोळ्यासमोर असायचा. विद्यार्थी परिषद अंबाजोगाई शहरात तत्कालीन काळात पुढे घेवुन जाण्यासाठी त्याने खांद्यावर घेतलेली पताका खुपच महत्वाची हे नक्की. प्रा.सतिश पत्की यांचे आम्हा सर्वांना बीडहून मार्गदर्शन असायचे. स्व.किरण फडणीस यांची आठवण देखील निमित्ताने येते.

# कवी लबडे यांच्या काव्यातील जाणिवा : डॉ. प्रभुणे

आधुनिक केसरी

**कवी बाळासाहेब लबडे यांच्या ‘मुंबई...बंबई....बॉम्बे....’ या कवितासंग्रहावर मान्यवर समिक्षकांनी विविध दृष्टिकोन समोर ठेऊन सविस्तर लिहिले आहे. त्यांच्या कवितेचे वेगळेपण व विशिष्ट्य कशात दडले आहे याची सोदाहरण चर्चा मान्यवराच्या समीक्षालेखांमधून केली गेली आहे. इथे मात्र ‘मुंबई...बंबई....बॉम्बे....’ या एकाच कवितासंग्रहाचा विचार न करता त्यांच्या दोन्ही कवितासंग्रहांचा विचार केलेला आहे. तो करताना त्यांच्या कवितेतून प्रकट होणारी प्रधान जीवनजाणीव कोणत्या प्रतिमासृष्टीतून प्रकट होते यांचाही विचार केलेला आहे.**

संवेदनशील मनाच्या डॉ. बाळासाहेब लबडे यांनी विविध वाङ् मय प्रकारांतून सर्जन केले आहे. सर्जनात्मक प्रतिभेबरोबरच विश्लेषणात्मक प्रतिभेचे वरदान लाभल्याने समीक्षात्मक लेखनही ते करू शकले आहेत. असे असल्याने ललित आणि समीक्षात्मक मिळून किमान डझनभर पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. कवी बाळासाहेब लबडे यांचे एकूण दोन कवितासंग्रह प्रकाशित झालेले आहेत. २०१५ साली ‘महाद्वार’ हा पहिला तर २०१७ साली ‘मुंबई...बंबई....बॉम्बे....’ हा दुसरा. असे असले तरी १९९६ पासून ते काव्यलेखनाकडे वळले हे ‘महाद्वार’च्या प्रास्तविकावरून समजते. काव्यलेखनाचा प्रारंभकाळ १९९६ तर दुस-या काव्यसंग्रहाचा प्रकाशनकाळ २०१७. हा काव्यप्रवास दोन दशकांचा प्रदीर्घ असा आहे. या काळात प्रकाशित झालेल्या दोन कवितासंगहांत अनुक्रमे ११४ आणि ९८ कविता आहेत. म्हणजे एकूण २१२ कविता समाविष्ट आहेत. **कविताप्रवाहांचे अनुकरण करणारी कविता नाही:** १९९६ ते २०१७ या दोन दशकांत नवे काव्यप्रवाह आले. काव्यस्वरूपात नवे बदल घडले. कवितांची नवी रूपे आली. बदलू लागलेल्या या काव्यस्वरूपांचे व काव्यबदलांचे संवेदनशील कवी लबडे आणि विश्लेषक समीक्षक लबडे आस्वादक आहेत. साक्षीदार आहेत. डोळस अभ्यासक आहेत. असे असूनही त्यांची कविता ‘अलिप्त’ आहे. कुणालाही अनुसरणारी नाही. कशाचेही अनुकरण करणारी नाही. कोणत्याही काव्यप्रवाहात सामील होणारी वा वाहून जाणारी नाही. ती त्यांची स्वतःची आहे. त्यातून व्यक्त होणा-या जाणिवा त्यांच्या स्वतःच्या आहेत. संवेदनशील कविमनाच्या अनुभवसंचितातून, जीवनविषयक धारणांतून आणि चिंतनातून आकारलेल्या आहेत. असे असल्याने लबडे यांच्या कवितांचा विचार करण्यापूर्वी काही काव्यविषयक तपशीलात्मक माहिती आधी लक्षात घेणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांचा काव्यप्रवास कसा होत गेला यावर प्रकाश पडण्याची शक्यता आहे. परंतु दोन्ही कविता संग्रहातील कवितांमधील पूर्वप्रकाशित कविता कोणत्या आणि संख्येने किती याचा तपशील कवितासंग्रहांच्या प्रास्तविकांमध्ये येऊ शकलेला नाही. तसेच कवितालेखनदिनाचा उल्लेख कवितेच्या खाली नसल्याने काव्यलेखनाचा कालावधीही समजू शकत नाही. असे असल्याने त्यांच्याशी फोनवर बोलून तपशील माहिती करून घेणे आवश्यक ठरले. कवी लबडे यांनी त्यांच्या प्रकाशित व अप्रकाशित कवितांच्या संदर्भात पुरवलेला तपशील असा: “१९९५ साली २२ वर्षांचा असताना मी पहिली कविता लिहिली. पुढील वर्षी १९९६ साली ती प्रकाशित झाली. त्या नंतर साधारण पंधरा कविता लिहिल्या. त्याही प्रकाशित झाल्या. परंतु नंतर एका दशकाहून अधिक काळ मी काव्याकडे वळलो नाही. काव्यलेखनात खंड पडला. या काळात मी अन्य वाङ् मय प्रकारांकडे वळलो. नंतर मग २०१३ साली पुन्हश्च माझ्या संवेदनशील मनाला कवितेने साद घातली आणि पुढील दोन वर्षांत अनेक कवितांचा जन्म झाला. या कवितांचा पहिला कवितासंग्रह प्रकाशित झाला. म्हणजे यातील बहुतांश कविता प्रथमच रसिकांसमोर आलेल्या आहेत. नंतर काव्यलेखनात खंड पडला नाही. म्हणून मग दुसरा कवितासंग्रह प्रकाशित होऊ शकला. यातील पाच एक कविताच काय त्या पूर्व प्रकाशित आहेत. बहुतांश कविता प्रथमच रसिकांसमोर आलेल्या आहेत. काव्यलेखनात खंड पडलेला नसल्याने आजपर्यंत साधारण शतकभर कविता माझ्याकडून लिहिल्या गेल्या आहेत.” कवी लबडे यांनी फोनवरून पुरवलेल्या तपशीलावरून त्यांचा काव्यलेखनाचा प्रवास कसा होत गेला हे काही प्रमाणात समजू शकते.




**कवी लबडे यांच्या कुतूहलाचे विषय:** लबडेंच्या ठिकाणी तीव्र संवेदनशीलता असल्यामुळे प्रकृतीने बहिर्मुख वाटणारी त्यांची कविता मूलतः अंतर्मुखतेने भवतालच्या वास्तवाचे आकलन करण्यात रमणारी आहे. भवताल आणि माणूस यांचे नाते शोधण्याचा प्रयत्न करते. मानवी वृत्ति-प्रवृत्तींचे निरीक्षण करण्यात रस घेते. मानवी संबंधांविषयी त्यांना विलक्षण कुतूहल वाटते. भवतालच्या वास्तवाचा, वास्तवाला आकार देणा-या परिसराचा, वैविध्यपूर्ण जीवनव्यवहाराचा, जीवनव्यवहारातील विसंगतींचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न करते. म्हणून त्यांच्या कवितेचे नाते बाह्य भवतालाशी, वास्तवाशी आणि परिसराशी आहे. असे असल्याने त्यांची कविता विषयनिष्ठ आहे. आशयनिष्ठ आहे. तेच तिचे सामर्थ्यही आहे.माणसांचा महासागर ज्या परिसरात वस्तीला असतो अशा ठिकाणी मानवी स्वभावाच्या विविध पैलूंचे दर्शन सहजतः घडत असते. किती तरी विसंगती जीवनव्यवहाराला आकार देत असतात. जीवनव्यवहाराच्या अनेकानेक छटांचा आढळ होत असतो. आषाढी-कार्तिकीला वर्षात किमान दोन वेळा उसळणा-या मानवी महासागराला सामावून घेणा-या आळंदीशी लबडे केवळ सहा महिन्यांचे असल्यापासून नाते आहे. सातव्या वर्गात असल्यापासून त्यांनी आळंदीला हारफुले विकण्याचे काम केले तर वयाच्या सतराव्या वर्षी दिवाळीच्या फुलांच्या कामाच्या निमित्ताने ते मुंबईला गेले. फुले विकण्याच्या निमित्ताने तिथे फिरले. मुंबईत पसरलेला मानवी महासागर जवळून पाहिला. अनुभवला. मानवी महासागर असलेल्या आळंदी आणि मुंबईतील जीवनव्यवहाराच्या अनेकानेक छटा त्यांच्या संवेदनशील मनाने अंतर्मुख वृतीतून टिपल्या. जीवनव्यवहारात आढळून येणा-या विसंगती पाहून त्यांचे कविमन अस्वस्थ झाले. त्यातून त्यांची कविता जन्मली. आळंदी आणि मुंबईकेंद्रित बनली. ‘महाद्वार’ आणि ‘मुंबई...बंबई....बॉम्बे....’ या कविता संग्रहातील कविता म्हणूनच ‘गावनिष्ठ’, ‘गावव्यवहारनिष्ठ’, ‘समाजव्यवहारनिष्ठ’ आहेत. विषयनिष्ठ, आशयनिष्ठ स्वरूपाच्या आहेत. बहिर्मुख वृत्तीतून जन्मल्या आहेत असे वाटू लागते. वास्तविक पाहता अंतर्मुखतेने भवतालच्या वास्तवाचे आकलन करण्यात रमणारी लबडे यांची वृत्ती आहे. भवताल आणि माणूस यांचे नाते शोधण्याचा प्रयत्न करणारी वृत्ती आहे. याचा प्रत्यय देणा-या ज्या कविता आहेत त्या काव्यरूप बनतात आणि ज्या कविता केवळ गावांची, व्यक्तींची, प्रसंगांची, व्यवहारांची वर्णने करतात, तपशील देतात त्या कविता वर्णनात्मक असल्याने काव्यात्मतेपासून दूर सरकतात. काही मोजक्या कवितांच्या आधारे उपरोक्त मुद्यांचा परामर्श घेताना त्यांची कोणत्या जीवनजाणिवांतून जन्मली आहे आणि या जाणिवांची अभिव्यक्ती कोणत्या शब्दप्रतिमांमधून होते ते लक्षात घेणे आवश्यक आहे. **कवितांतील जीवनजाणिवा:** कोणत्याही कवीचे जीवनविषयक आकलन त्याच्या काव्यांत प्रतिबिंबित होत असते. कविमनाला भावलेला जीवनार्थ काव्यारूप घेत असतो. कधी काही एका विशिष्ट जीवनविषयक विचारसरणीने, तत्त्वज्ञानाने भारून जाऊन त्याचे सर्जन होत असते तर कधी त्याच्या स्वतःच्या जीवनाकलनाला तो शब्दरूप देत असतो. लबडे यांनी त्यांच्या बालपणाचा जो त्रोटक तपशील पुरवला आहे त्यावरून आळंदीसारख्या क्षेत्रात त्यांचे बालपण गेले. आर्थिक परिस्थिती सर्वसाधारण असल्याने उपजीविका सुकर व्हावी म्हणून फुले व पानाफुलांच्या माळा भाविकांना विकत. त्यासाठी पायी फिरावे लागे. मैलो न् मैल पायी चालत आलेले गरीब वारकरी लबडे बघत. माउलीवरील त्यांच्या दृढ श्रद्धेला अनुभवीत. गरीबीला त्यांनी स्वीकारलेले असे. जणू गृहीतच धरलेले असे. गरिबीबद्दल त्यांची तक्रार नसे. दोन वेळची भूक भागवणे हाच एक जीवनप्रश्न असतो त्यांचा. भूक हीच त्यांची आळंदी असते. माउली असते. बाकी कोणत्या तत्त्वज्ञानात त्यांना रस नसतो. या भुकेल्या माणसांना पाहून, त्यांचा जीवनसंघर्ष पाहून अस्वस्थ झालेले संवेदनशील कविमन या भुकेच्या, भुकेसाठी कराव्या लागणा-या जीवनसंघर्षाच्या जाणिवा लबडे यांच्या कवितात येतात. मग या कविता आळंदीच्या असोत वा मुंबईच्या असोत. या दोन्ही गावांशी संबंधित असलेल्या कवितांत भूक, भुकेशी संघर्ष करणा-या कष्टकरे स्त्री-पुरुष अनेकदा येतात. हे कष्ट मजुरीचे असतील नाही तर शरीरविक्री करण्याचे असतील. **क्रमशः**



# लोकमान्य टिळक...!

आधुनिक केसरी

चिखल आणि पाण्यात
कमळ हा उगवतो,
तसा टिळकांचा जन्म
चिखलगावात होतो.

केशरीतून ताशेरे
इंग्रजांवर ओढले,
त्यांच्या कार्य-काळावर
रोज टीकास्त्र सोडले.

स्वराज्य हा जन्मसिध्द
हक्क, ही प्रतिज्ञा घेतली,
इंग्रज सरकारावर
ही सिंहगर्जना केली.

फक्त, स्वदेशी वापरा
विदेशींची होळी करा,
राष्ट्रीय शिक्षणातून
स्वराज्याचा दयावा नारा.

टिळकांना सहा-वर्षे
तुरुंगामध्ये ठेवले,
तिथेच, "गितारहस्य"
पवित्र ग्रंथ लिहिले.

लोकमान्य टिळकांचा
मुंबईत झाला अंत,
त्यांच्या मनात राहीली
देश स्वातंत्र्याची खंत...!



# अण्णा भाऊ साठे..!

आधुनिक केसरी

दिड दिवसांची शाळा
शिके अण्णाभाऊ साठे,
साहित्यांच्या लिखानांनी
समाजात झाले मोठे.

या वारणेच्या वाघाचा
वाटेगावी जन्म झाला,
संयुक्त महाराष्ट्रात
लेखनीने वार केला.

वंचितांच्या समस्यांना
वाच्या भाऊंनी फोडली,
जुलमी चाली-रितीची
धिंड त्यांनीच काढली.

लोकनाट्य - कादंबरी
पोवाडे - लावणीतून,
प्रबोधन साकारले
माझी मैना छक्कड मधून.

अण्णाभाऊंचा करूनी
जयघोष समाजांनी,
"साहित्यरत्न, लोकशाहीर"
पदवी दिली लोकांनी.

असा शाहीर होणार
नाही या महाराष्ट्रात,
अण्णाभाऊंचे साहित्य
गर्जत राहील लोकात...!

- अय्युब पठाण लोहगांवकर,
ता. पैठण.
मो. ९७६४३५०३७४.

# येत्या विधानसभा निवडणुकीत मंत्री भुमरेचा पराभव अटळ : दत्ता गोर्डे

आधुनिक केसरी न्यूज



**पैठण :** तालुका राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या पक्षाची अढावा बैठक घेण्यात आली यात औरंगाबाद नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष कैलास पाटील व राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अनुराग शिंदे यांच्या सत्कार समारंभ अयोजीत केला होता.

याप्रसंगी दत्तात्रय गोर्डे यांनी पैठण विधानसभा मतदारसंघात विकासाचे कामे नसून नुसते बिले काढायची कामे चालु असुन मार्केटकमेटीचे निवडणूकीत आमच्या काही गद्दारा मुळे पराभव झाल्याचा अरोप करत विधानसभा तर मंत्री संदिपान भुमरेच्याच विरोधात लढवली जाईल.


तसेच येणाऱ्या सर्वच निवडणूका अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली लढवल्या जातील त्यासाठी बुथ कमेटीचे काम सुरू करुन तालुक्यातील प्रत्येक गावात राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांना उभारी देण्याचे काम करू. नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष कैलास पाटील यांनी आढावा बैठकीत मार्गदर्शन करताना अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आता प्रत्येक तालुक्यातील राष्ट्रवादीचे कार्यकर्ते तयारीला लागले असुन अजित पवार सोबतीला आमदार संख्या बघीतले तर जास्तीतची असल्याने घड्याळ ही आमचीच असुन राष्ट्रवादी आमचाच पक्ष असून कार्यकर्तेनी संभ्रमात राहु नये.

आम्ही सत्ता आहे म्हणून अजित पवार यांच्या सोबत नाही तर अजित पवारांच्या काम करण्याची तसेच विकासाच्या दृष्टीने आम्ही सोबत आहोत. महाराष्ट्राच्या सत्तेवर तिन पक्षाचे सरकार असल्याने कार्यकर्तेनी आता येणाऱ्या निवडणूकी साठी कामाला लागा. अजित पवार गटाकडे बरेच महत्त्वाचे खाते असुन विकास कामे नक्कीच होतील असा विश्वास दाखवत सत्कार समारंभात ते बोलत होते. यावेळी अजित पवार गटाचे राष्ट्रवादी युवकचे जिल्हाध्यक्ष अनुराग शिंदे, माजी नगराध्यक्ष दत्ता गोर्डे, शहराध्यक्ष जितू परदेशी, तालुकाध्यक्ष आप्पासाहेब निर्मळ,आप्पासाहेब गायकवाड, भाऊसाहेब तरमळे, बजरंग लिंबोरे, विजय चव्हाण, भाऊसाहेब पिसे, गोपीनाथ गोर्डे,अशोक औटे, निता कायस्थ, प्रकाश दिलवाले, हसन्नोदिन कटारे, पी.आर.थोटे, सचिन जोतिक, ज्ञानेश घोडके, अस्लम पठाण, संजय कोरडे,संजय सदावर्ते, अमोल तुपे, शुभम गायकवाड, नजीर पठाण यांच्या सह पदाधिकारी यांची उपस्थिती होती.

# धनकर यांच्या निधनाने साहित्यिक क्षेत्राची मोठी हानी : हंसराज अहीर

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** चंद्रपूर-गडचिरोली या जुळया जिल्यातील सामाजिक, शैक्षणिक,



सांस्कृतिक, साहित्यिक, राजकीय व पत्रकारीता क्षेत्रातील दिपस्तंभ पूर्व प्राचार्य मदनराव धनकर यांच्या दुःखद निधनामुळे या सर्वच क्षेत्राची कधीही भरून न निघणारी हानी झाली आहे. गेली 6 दशके विविध क्षेत्रांमध्ये आपल्या प्रज्ञेच्या बळावर धनकर सरांनी निरंतर ज्ञानोपासनेचे व्रत जोपासत समाजाला ज्ञान देण्याचा भगीरथ प्रयत्न केला. एखादा विषय कितीही क्लिष्ट असला तरी त्या विषयाला सोपे करुन व त्यात नाविन्याची भर घालत मदनरावांनी विद्यार्थ्यांना ज्ञानार्जनाचे धडे दिले आहेत त्यामुळेच विद्यार्थीप्रिय प्राध्यापक व प्राचार्य म्हणून त्यांची ख्याती होती. पत्रकारीता क्षेत्रातील त्यांचे योगदान अमुल्य आहे. हरिवंश या साप्ताहिकातील त्यांचे लिखान हे साहित्य व पत्रकारीता क्षेत्रातील लोकांसाठी चालते बोलते विद्यापीठच होते.

या सर्वसमावेशक व्यक्तित्वाच्या निधनाचे माझ्यासह अनेकांना अपार दुःख असून त्यांच्या आत्म्यास शांती लाभो अशी ईश्वरचरणी प्रार्थना करतो अशी शोकसंवेदना राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा पूर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांनी व्यक्त केली आहे.

# सूरजागडतून होणाऱ्या वाहतुकीवर आळा घाला : आ. सुधाकर अडबाले

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** गडचिरोली जिल्ह्यातील सुरजागड



येथील खाणीतून लोह खनिजाची वाहतूक करणाऱ्या वाहनांमुळे मागील काही महिन्यांत चंद्रपूर, गडचिरोली या दोन जिल्ह्यात अपघाताच्या घटनांत वाढ झाली आहे. या अपघातात अनेकांसह एका शिक्षक कर्मचाऱ्यानेसुद्धा जिव गमावला होता. सुरजागड खाणीतून होणाऱ्या वाहतुकीवर आळा घालण्यासाठी हा गंभीर प्रश्न आमदार सुधाकर अडबाले यांनी तारांकीत प्रश्नाच्या माध्यमातून उपस्थित केला. त्यावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, परिवहन विभागामार्फत गडचिरोली जिल्ह्यातील अपघात कमी करण्यासाठी एकात्मिक वाहतूक व्यवस्थापन प्रणाली बसविण्याबाबतच्या सूचना परिवहन आयुक्त यांनी दिल्या असल्याचे सांगितले.

गडचिरोली जिल्ह्यातील हा गंभीर प्रश्न आमदार सुधाकर अडबाले यांनी पावसाळी अधिवेशनात तारांकीत प्रश्नाच्या माध्यमातून उपस्थित केला होता. गडचिरोली जिल्ह्यामध्ये सुरू असलेल्या विविध राष्ट्रीय महामार्गाच्या कामासंदर्भात जनहित याचिका दाखल करण्यात आली होती. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने यासंदर्भात नोटीस बजावली आहे. अपघाताच्या घटना रोखण्यासाठी ठराविक अंतरावर चेक पोस्ट तयार करण्यात आले आहेत. वाहनांची नियमित तपासणी केली जात आहे. वाहतुकीच्या मार्गावर दिशादर्शक फलक, वेगमर्यादेचे फलक, स्पीड ब्रेकर बसविण्यात आले आहेत. पोलिस विभागातर्फे नाकाबंदी करून वाहनांची तपासणी केली जात आहे. अपघात झाल्यास मदतीकरिता रुग्णवाहिका तैनात करण्यात आल्या आहेत. कंत्राटदार कंपनीकडून लोहखनिज वाहतुकीच्या मार्गावर सुरक्षा गार्ड तैनात करण्यात आले आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत गडचिरोली जिल्ह्यामध्ये विविध ठिकाणी रस्ता नूतनीकरणाची, उन्नतीकरणाची व मजबुतीकरणाची तसेच काही कामांची निविदा प्रक्रियेची कामे सुरू असल्याची माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तरात दिली.

# प्रधानमंत्री पीक विमा योजनेला 3 ऑगस्टपर्यंत मुदतवाढ पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रयत्नांना यश

आधुनिक केसरी न्यूज

**प्रियंका पुणवटकर**

**चंद्रपूर :** गत आठवड्यात चंद्रपूर जिल्ह्यात झालेल्या




मुसळधार पावसामुळे जनजीवन पूर्णतः विस्कळीत झाले. अनेक गावांचा संपर्क तुटला तर विद्युत, इंटरनेट सेवा खंडीत झाली होती. त्यामुळे शेतक-यांना प्रधानमंत्री पीक विमा योजनेसाठी वेळेत नोंदणी करणे शक्य होणार नाही. ही बाब लक्षात घेत राज्याचे वने व सांस्कृतिक कार्य मंत्री तथा चंद्रपूरचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केंद्रीय कृषी सचिवांना पत्र लिहिले. या पत्राची दखल घेऊन, प्रधानमंत्री पीक विमा योजनेला आता 3 ऑगस्टपर्यंत मुदतवाढ मिळाली आहे. प्रधानमंत्री पीक विमा योजना शेतक-यांच्या दृष्टीने अतिशय महत्वाची आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या शेतमालाच्या नुकसानीची भरपाई या योजनेंतर्गत शेतक-यांना दिली जाते. त्यामुळे शेतक-यांनी ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक आहे. मात्र चंद्रपूर जिल्ह्यात गत आठवड्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक गावांचा संपर्क तुटला. त्यामुळे शेतक-यांना 31 जुलैपर्यंत पीक विमा योजनेची नोंदणी करता येणार नाही, परिणामी अनेक शेतकरी या योजनेपासून वंचित राहण्याची शक्यता असल्यामुळे जिल्ह्याचे पालकमंत्री मुनगंटीवार यांनी केंद्रीय कृषी सचिव मनोज अहुजा यांना पत्र लिहिले. प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या नोंदणीची मुदत किमान 15 दिवसांनी वाढवून शेतक-यांना दिलासा द्यावा, अशी मागणी त्यांनी पत्राद्वारे केली होती. त्यामुळे आता प्रधानमंत्री पीक विमा योजनेला 3 ऑगस्टपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. यापूर्वी पीक विमा योजनेंतर्गत एकूण विमा हप्ता रकमेच्या 2 ते 5 टक्के रक्कम शेतक-यांना भरावी लागत होती. त्यामुळे बहुतांश शेतकरी या योजनेत सहभागी होत नव्हते. परिणामी नैसर्गिक आपत्ती, अतिवृष्टीत नुकसान झाल्यानंतरही शेतक-यांना मदतीपासून वंचित राहावे लागत होते. ही बाब लक्षात घेऊन राज्य सरकारने शेतक-यांना दिलासा देण्यासाठी केवळ 1 रुपया प्रति अर्ज या नाममात्र दराने प्रधानमंत्री पीक विमा योजना 2023-24 सुरू केली आहे.चंद्रपूर जिल्ह्यात खरीप हंगाम 2023 करीता सदर योजना ओरिएन्टल इन्शुरन्स कं. लि. या विमा कंपनी कडुन राबविण्यात येणार आहे. सदर विमा कंपनीचा टोल फ्री क्रमांक 1800118485 असून ई-मेल pmfby.160000@orientalinsurance.co.in आहे. अडचण आल्यास यांच्याशी करा संपर्क : प्रधानमंत्री पीक विमा योजनेसाठी नोंदणी करतांना शेतक-यांना काही अडचण आल्यास त्यांनी ओरिएन्टल इन्शुरन्स विमा कंपनीच्या संबंधित तालुका समन्वयकांशी संपर्क करावा. सदर कंपनीचे जिल्हा समन्वयक प्रतीक करपेनवार ( मो. 8080192076 ) असून देवानंद रोहनकर ( तालुका समन्वयक, चंद्रपूर, मो. 9579808500 ), निलेश धोपटे ( बल्लारपूर, मो. 9881545801 ), आशिष तुपट ( ब्रम्हपुरी, मो. 9588608847 ), निहाल नागापुरे ( सिंदेवाही, मो. 8459735371 ), रुपेश रोहणकर ( मूल, मो. 7972564857 ), सुरज चौधरी ( सावली, मो. 9579957562 ), तिलकराम चांदेकर ( पोंभुर्णा, मो. 7378664440 ), संदीप बोगेवार ( गोंडपिपरी, मो. 7448167282 ), अमन हजारे ( भद्रावती, मो. 8237455338 ), अभिजीत गोगे ( कोरपना, मो. 9022982158 ), तुषार चौधरी ( वरोरा, मो. 8806066795 ), राकेश गट्टेवार ( राजुरा, मो. 9423319383 ), चंद्रशेखर रेवतकर ( चिमूर, मो. 9975026352 ), सुशांत निकोडे ( नागभीड, मो. 8975704125 ) आणि कुणाल सिडाम ( तालुका समन्वयक जिवती, मो. 7887374512 ) आहेत.

# सावळदबारा परिसरात डोळ्यांची साथ

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा परिसरात डोळ्यांची साथ आली आहे. डोळ्यांच्या साथीने रुग्ण बेजार झाले असून, नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन वैद्यकीय अधिकारी व्ही पी राजपूत यांनी केले आहे. सर्दी तापाची किंवा व्हायरल साथ ज्याप्रमाणे पसरते, तशीच डोळे येण्याची साथही



पसरत आहे. डोळे येणे हा संसर्गजन्य आजार असून, डोळे आलेल्या रुग्णांनी योग्य ती काळजी घेणे गरजेचे असते, अन्यथा काही दिवसांत या समस्येच्या रुग्णांची संख्या दुप्पट आणि तिप्पट झाल्याचे पाहायला मिळते. डोळा लाल होणे, सुजणे, डोळ्यातून पाणी किंवा चिकट स्राव येणे, अशा समस्या या काळात उद्‌भवतात. हा आजार वेगाने पसरू नये, यासाठी विशेष काळजी घेणे गरजेचे असते. डोळे आले की, आपण त्यांच्यापासून दूर राहतो किंवा त्या व्यक्तीला गॉगल नाहीतर चष्मा घालण्यास सांगतो. एकमेकांकडे पाहिल्याने डोळ्यांचा ससर्ग होतो, असा आपला समज असतो. मात्र, आपले हात डोळ्यांना लागतात आणि हेच हात दुसऱ्या व्यक्तीला लागले, तर हा संसर्ग पसरतो. यासाठी सतत डोळे आणि हात स्वच्छ धुणे हा एकमेव उपाय असतो. डोळे आलेल्या व्यक्तीने हात स्वच्छ ठेवावेत, तसेच हात डोळ्यांना अजिबात लावू नयेत.

पावसाळ्यात विविध प्रकारच्या विषाणूंची वाढ होण्यास पोषक वातावरण असते . त्यामुळे पावसाळ्याच्या दिवसांत साधारणपणे डोळ्यांची साथ वाढते . डोळ्य खुपल्यासारखे होणे, डोळे जड वाटून खाज येणे, डोळ्यातून चिकट स्राव येणे, अशा समस्या निर्माण होतात . अशी लक्षणे आढळल्यास तातडीने डॉक्टरांना दाखवून उपचार घ्यावा .

**– डॉ . व्ही पी राजपूत, वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, सावळदबारा, ता . सोयगाव**



# मनोहर भिडेवर कारवाई करण्याची मागणी खंडाळ्यात समता परिषदेने दिले निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** वादग्रस्त वक्तव्य प्रकरणी मनोहर भिडे यांच्या वर कारवाई करण्याची मागणी अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद सातारा जिल्हा यांच्या वतीने खंडाळा येथे करण्यात आलेली आहे.

याबाबतचे निवेदन तहसिलदार यांना देण्यात आले. दिलेल्या निवेदनात असे म्हटलेले आहे की, मनोहर भिडे यांच्या कडून वारंवार महापुरुषांबाबत वादग्रस्त वक्तव्य करण्यात येत आहे.काही दिवसांपूर्वी मनोहर भिडे यांनी महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या बाबत वादग्रस्त वक्तव्य केले.त्यांनतर त्यांनी आता राष्ट्रपिता महात्मा गांधी व पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या विषयी वादग्रस्त वक्तव्य केले.मनोहर भिडे यांच्याकडून वारंवार महापुरुषांचा अपमान करत समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. तसेच यामुळे समाजात कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत आहे. तरी मनोहर भिडे यांच्या वर गुन्हा दाखल करून कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी विनंती करण्यात आलेली आहे. यावेळी अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र यशवंत नेवसे,खंडाळा तालूका अध्यक्ष महादेव ऊर्फ बंडा क्षीरसागर,राज्य प्रसिद्धी प्रमुख दशरथ ननावरे, जिल्हा कार्यकारीणी सदस्य प्रकाश दगडे, नायगाव ग्रामपंचायत सदस्य सागर नेवसे,खरेदी विक्री संघाचे संचालक संपत नेवसे, प्रदीप राऊत, निशांत पारखी,राजेंद्र गोविंद नेवसे, केदार क्षीरसागर तसेच ग्रामस्थ व समता परिषदेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# कर्मचाऱ्यांच्या समस्या सोडविसाठी निदर्शने

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** महाराष्ट्र राज्य नगरपरिषद, नगरपंचायत कर्मचारी व संवर्ग कर्मचारी संघर्ष समितीच्या वतीने संघर्ष समितीचे राज्य निमंत्रक डॉ. डी एल कराड , ॲड सुरेश ठाकूर, डी पी शिंदे, रामगोपाल शर्मा, राज्याचे मुख्य संघटक, संतोष पवार, ॲड सुनील वाळूंजकर यांनी महाराष्ट्रातील तमाम नगर परिषद नगरपंचायत कर्मचारी संवर्ग कर्मचाऱ्यांच्या प्रदिर्घ काळापासून प्रलंबित विविध मागण्याबाबत शासनाचे लक्ष वेधण्यासाठी दिनांक ३१ जुलै २०२३ रोजी मुंबई येथे भव्य राज्यव्यापी मोर्चाचे आयोजन केले होते. परंतु ३१ जुलै २०२३ रोजी विधान सभेचे कामकाज २९ जुलै ते १ ऑगस्ट २०२३ पर्यंत बंद आणि पुर परिस्थिती , मदत कार्याकरीता कामगारांचा सहभाग महत्त्वाचा असल्याने नियोजित मोर्चा तूर्त स्थगित करण्याचा निर्णय घेतलेला आहे. व राज्य पातळीवर संघटनेच्या झालेल्या निर्णयानुसार शासनाचे लक्ष वेधण्यासाठी आज राज्यातील बहूतांश नगरपरिषदे समोर निदर्शने करण्यात आली आहेत. शासनाकडे संघर्ष समितीच्या वतीने दिलेल्या मागण्यांचे निवेदन कर्मचाऱ्यांच्या भावना व प्रलंबित मागण्या शासनाकडे पोहोचवाव्यात अशी विनंती निदर्शनाद्वारे तसेच निवेदन देऊन प्रशासनाकडे करण्यात आली.आणि आज आम्ही सर्व कर्मचारी नगर परिषदेसमोर निदर्शने करीत आहोत या प्रश्नांची सोडवणूक न झाल्यास भविष्य काळात कामगारांमधील असंतोषाचे राज्यव्यापी आंदोलनामध्ये रूपांतर होणार याची नोंद शासनाने घ्यावी अशा आशयाचे निवेदन शासनाला देण्यात यावे असे निवेदन मुख्याधिकारी राहूल इंगळे यांना कामगार नेते संतोष पवार, मधूकर भोईर, हरेश जाधव, राजेश सोलंकी, धनंजय आंब्रे, जितेंद्र जाधव व ईतर कामगार बंधू भगिनींनी दिले.

# धन्य वरुणराजाची करनी.. अन् बळीराजाच्या डोळ्यात पाणी

## आ. अमित झनकांनी जाणल्या शेतकऱ्यांच्या व्यथा

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत खडसे**

**वाशिम :** गेल्या वर्षीच्या अवकाळी व अतिवृष्टीने खरीप व रब्बी हंगामाचा फटका बसलेले शेतकरी यावर्षी खरिपाची पेरणी मृग नक्षत्रात होईल या अपेक्षेने पेरणीपूर्व मशागत करून सुसज्ज झाले होते. पण वरुणराजाच्या मनात काही वेगळेच होते. आणि पाहता, पाहता मृग नक्षत्र कोरडेच गेले. निराश झालेले शेतकरी अखेर जून मध्ये तरी पेरणी होईल, या आशेने डोळ्यात 'पाणी' आणून पावसाची वाट पाहत होते. परंतु संपूर्ण जून महिना देखील उन्हाळ्यातच गणला गेला. शेवटी जुलै महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात वरुणराजाचे आगमन झाले. आणि एकदाची पेरणीला सुरुवात झाली. पीकं उगवून उभारी धरण्याच्या बेतात असतांनाच परत एकदा वरुणराजाला खाज सुटली. परिणामी मुसळधार पाऊस होऊन कोवळी पिकं जमीनदोस्त झाली. हे दृश्य पाहून नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांच्या डोळ्यातून पुन्हा एकदा 'पाणी' वाहू लागले एक महिन्यात दोन वेळा पावसाअभावी शेतकऱ्यांच्या डोळ्यात 'पाणी' आल्यामुळे, असं म्हणण्याची वेळ आली की, धन्य वरुणराज्याची करनी..! अन्.. बळीराजाच्या डोळ्यात पाणी..!!

पावसाळी अधिवेशनानिमित्त मुंबईत असलेले रिसोड, मालेगाव मतदार संघाचे आमदार अमित झनक यांना मुसळधार पावसामुळे झालेल्या नुकसानीची माहिती मिळताच त्यांनी तातडीने आपल्या मतदारसंघात धाव घेऊन, अतोनात नुकसान झालेल्या नेतन्सा, जोगेश्वरी, जायखेडासह इतर गावातील नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली. व शेतकऱ्यांशी संवाद साधला. त्यांच्या व्यथा जाणून घेऊन संबंधित प्रशासनाला नुकसानग्रस्त भागाचे तातडीने पंचनामे करण्याचे आदेश दिले. शिवाय पंचनाम्यांचा अहवाल प्राप्त होताच तातडीने नुकसानग्रस्तांना मदत करा..! अशा सूचना सुद्धा संबंधित अधिकाऱ्यांना आमदार अमित झनक यांनी केल्या आहेत. यावेळी नेतन्सा, जायखेडा, जोगेश्वरी, आदी गावातील बहुसंख्य शेतकरी उपस्थित होते.



रिसोड तालुक्यातील केनवड महसूल मंडळात नुकत्याच झालेल्या ढगफुटी सदृश मुसळधार पावसामुळे परिसरातून वाहणाऱ्या कांचनगंगा नदीसह इतर लहान मोठ्या नाल्यांना महापुराचे स्वरूप आले होते. परिणामी परिसरातील जोगेश्वरी, आंचळ, जायखेडा, नेतन्सा, तपोवन आदी गावांना मुसळधार पावसाचा जबरदस्त फटका बसला आहे. अतिवृष्टीमुळे बहुतांश भागात पेरलेल्या जमिनीत पाणी साचून तलावाचे स्वरूप आले होते. तर नदीकाठच्या जमिनी खरडून जाऊन कोवळी पिकं जमीनदोस्त झाली आहेत. कांचन नदीला आलेल्या महापुराच्या विळख्यात सापडलेले जोगेश्वरी, जायखेडा व नेतन्सा येथील ग्रामस्थांची दयनीय अवस्था झाली आहे. जोगेश्वरी गावाला तालुक्याच्या ठिकाणी जोडणारा मुख्य रस्ता खरडून गेल्यामुळे तेथील ग्रामस्थांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे.

# खरीप हंगामातील ई-पीक पाहणी १०० टक्के पूर्ण : कृषी सहाय्यक निकुंभ

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांनी चालू खरीप हंगामातील ई-पीक पाहणी १०० टक्के पुर्ण करुन घेणे आवश्यक आहे, असे आवाहन सोयगाव कृषी विभागाच्या वतीने तालुका कृषी अधिकारी मदन सिसोदिया यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी सहाय्यक विजयसिंह निकुंभ यांनी केले आहे.सोयगाव तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांनी ई-पीक पाहणी मोबाईल ॲपच्या सहाय्याने तलाठ्याकडे न जाता स्वतःच्या मोबाईलवरून आपल्या ७/१२ वर विविध पिकांची नोंदणी करता येणे शक्य झाले आहे. सोयगाव महसूल विभागाचा ई-पीक पाहणी प्रकल्प १५ ऑगस्ट २०२१ पासून राज्यभर राबविण्यात येत आहे. या ई-पीक पाहणी ॲपच्या माध्यमातून मागील वर्षी हंगामामध्ये सोयगाव तालुक्यातील शेतकऱ्यांनी १०० टक्के ई-पीक पाहणी करुन आपल्या पीकाची नोंदणी करून शासनाच्या विविधि योजनांचा लाभ घेतला आहे. त्यामुळे सद्यस्थितीत सुरु असलेल्या खरीप हंगामाची ई-पीक पाहणी देखील आपल्याला यंदा पूर्ण १०० टक्के पुर्ण करावयाची आहे.

खरीप हंगाम २०२३ पीक पाहणी नोंदणीसाठी ई - पीक पाहणीचे २.०.११ हे अपडेटेड व्हर्जन गूगल प्ले स्टोअर वर उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. तरी सर्व खातेदार शेतकऱ्यांनी नवीन व्हर्जन अपडेट करून घेणे आवश्यक आहे. खरीप हंगामाच्या प्रत्यक्ष ई-पीक पाहणी मोबाईल ॲपद्वारे पीक पाहणी करण्यासाठी ०१ जुलै २०२३ पासून सुरु करण्यात आलेली आहे. औरंगाबाद जिल्हयातील सर्व शेतकरी बंधु-भगिनीं, गावातील सरपंच, पोलीस पाटील, तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहाय्यक, कोतवाल, स्वस्त धान्य दुकानदार, महात्मा गांधी तंटामुक्ती अध्यक्ष, बचत गट प्रतिनिधी, सहकारी संस्थाचे अध्यक्ष व सचिव, अध्यक्ष- शेतकरी दुध उत्पादक संघ, पाणी फाउंडेशन गट, पोकरा प्रतिनिधी, ग्रामरोजगार सेवक, तांत्रीक सहाय्यक, बँक प्रतिनिधी, शाळा व कॉलज विद्यार्थी, प्रगतशिल शेतकरी, सर्व ग्रामपंचायत समिती, पंचायत समिती व जिल्हा परिषदचे सदस्य, मिडिया प्रतिनिधी, आपले सरकार सेवा केंद्र चालक यांनी देखील शासनाच्या महत्त्वाकांक्षी असलेल्या ई-पीक पाहणी प्रकल्पात सहभाग घेवून शेतकऱ्यांना ई-पीक पाहणी करण्यासाठी प्रोत्साहीत करावे असे हि आवाहन कृषी सहाय्यक विजयसिंह निकुंभ राजपूत यांनी केले आहे.

तरी सोयगाव तालुक्यातील सर्व शेतकरी बंधु-भगिनींना अवाहन करण्यात येते कि त्यांनी खरीप हंगामा २०२३ साठी दिलेल्या कालावधीमध्ये आपली ई-पीक पाहणी नोंदणी पूर्ण करावी जेणे करून शासनाच्या विविध योजना, पिक विमा, पिक कर्म. शासकीय अनुदान ई. विविध योजनांचा लाभ घेण्यास मदत होणार आहे. आपले संबंधित तालुकानिहाय हेल्पडेस्कच्या माध्यमातून सकाळी ०८.०० ते सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत ई-पिक पाहणी करतांना शंका व अडचणी आल्यास सोयगाव कृषी विभागाशी संपर्क साधावा असे आवाहन विजयसिंह निकुंभ कृषी सहाय्यक सोयगाव यांनी केले आहे.

# जिल्हाप्रमुख पुरूषोत्तम जाधवांकडून सामाजिक कार्यकर्त्याचे कौतुक

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** कोणत्याही कामाचं श्रेय घेण्याबाबत हे मीच केलं म्हणून अनेक राजकीय नेते आपली टिमकी वाजवित असतात.ज्या कामासाठी आपण कधीच प्रयत्न केलेले नाहीत.त्या कामाचे श्रेय घेण्याचा प्रयत्न ही काही राजकीय नेते मंडळी कडून केला जात असतो.परंतु असेही काही नेते या राजकारणात आपल्याला दिसून येत असतात की,ज्या कामाबद्दल ज्यांनी विशेष मेहनत घेतलेली असते.त्या कामाचे श्रेय ज्या त्या व्यक्तीलाच ते देत असतात. खंडाळ्याच्या ट्रामा केअर सेंटर बाबतीत शिवसेनेचे जिल्हाप्रमुख पुरुषोत्तम जाधव यांच्याकडून मोठेपनाचं दर्शन पाहायला मिळालं.

एका सामाजिक कार्यकर्त्याचे ते कौतुक करताना दिसुन आले.

खंडाळा येथे ट्रामा केअर सेंटर साठी ८ कोटी ७४ लाखाचा निधी मंजूर झालेला असून हा निधी मिळविण्यासाठी शिवसेनेचे सातारा जिल्हा प्रमूख पुरुषोत्तम जाधव यांनी विशेष प्रयत्न केलेले आहेत.निधी बद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,

पालकमंत्री शंभूराज देसाई,आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांचे विशेष आभार मानलेले आहेत.या व्यतिरिक्त सुद्धा त्यांनी खंडाळा येथील सामाजिक कार्यकर्ते संतोष देशमुख यांचे विशेष कौतुक करत त्यांच्या लढयाला श्रेय दिलेले आहे.कारण एकच होते की ट्रामा केअर सेंटर साठी जागा उपलब्ध होण्याबाबत संतोष देशमुख यांनी विशेष प्रयत्न केले होते.त्या जागेचा शासन प्रशासन स्तरावर विशेष पाठपुरावा वारंवार केला जात होता.२०१३ लाच ट्रामा केअर सेंटर उभारणीसाठी मंजुरी प्राप्त झाली होती.परंतु प्राथमिक आरोग्य केंद्राच्या नावावर असलेली जागा ग्रामीण रुग्णालयाच्या नावावर होण्यासाठी विशेष प्रयत्न सुरू होते.अखेर २०१७ ला हा विषय मिटला होता.परंतु निधी अभावी ह्या ट्रामा केअर सेंटर ला एक ही वीट रचता आलेली नाही.आज शिवसेनेचे जिल्हा प्रमुख पुरुषोत्तम जाधव यांच्या विशेष प्रयत्नातून ट्रामा केअर सेंटर ला निधी उपलब्ध झालेला असताना ट्रामा केअर सेंटर बाबत सामाजिक कार्यकर्ते संतोष देशमुख यांच्या लढयाला सुद्धा श्रेय दिलेले आहे.

ट्रामा केअर सेंटर लवकरात लवकर उभे राहावे म्हणून यासाठी जशी सामाजिक कार्यकर्ते संतोष देशमुख यांची मागणी होती. तशीच मागणी नेतेमंडळी,सर्वसामान्य जनता यांची सुद्धा होतीच. त्यामुळे अनेकांनी कळत नकळतपणे यासाठी प्रयत्न केले सुद्धा असतीलच.अशा सर्वांचेच कौतुकच.आज ट्रामा केअर सेंटर साठी ८ कोटी ७४ लाखाचा निधी मंजूर झालेला असून ही आनंदाची बाब आहे की अपघात ग्रस्त झालेल्या व्यक्तींना ताबडतोब ट्रामा केअर सेंटरच्या माध्यमातून सेवा उपलब्ध होणार आहे.ट्रामा केअर सेंटर अभावी जाणारे जीव त्वरित सेवा उपलब्ध झाल्याने आता वाचणार आहेत.त्यामुळे हे ट्रामा केअर सेंटर किती उपयुक्त आहे. याचे महत्व समजत आहे.म्हणून ट्रामा केअर सेंटर साठी उपलब्ध झालेली जागा महत्वाची तर आहेच शिवाय ती जागा मिळण्यासाठी ज्या सामाजिक कार्यकर्त्याने प्रयत्न केले तो सामाजिक कार्यकर्ता संतोष देशमुख हा ही तितकाच महत्वाचा आहे.

ट्रामा केअर सेंटर साठी जागाच उपलब्ध नसती तर निधी तरी कशाला मिळाला असता.हे ही तितकेच महत्वाचे होते.शिवसेनेचे जिल्हा प्रमुख पुरुषोत्तम जाधव यांनी संतोष देशमुख यांच्या लढ्याबाबत आवर्जुन उल्लेख केलेला आहे.



# कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांच्या नेतृत्वाखाली युवकांना नोकरीपत्राचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** युवकांना रोजगार मेळाव्याच्या निमित्ताने विविध क्षेत्रात रोजगार देण्याचा चंग कामगार नेते महेंद्रजी घरत यांनी आपल्या सोबत अहोरात्र काम करणाऱ्या कष्टाळू सहकाऱ्यांसह बांधलेला आहे. त्यानिमित्ताने जसखार, धुतूम उरण येथे तीन-तीन महिन्याच्या अंतराने रोजगार मेळाव्याचे आयोजन करून युवक युवतींची शैक्षणिक अहर्ता करून नव्या ॲपची निर्मिती करत माहिती संकलन करून विविध कंपन्या सोबत शेअर करत युवक युवतीना रोजगारासाठी मुलाखतीसाठी प्राधान्य मिळवून दिले व याचीच परिणीती म्हणजे रोजगार मेळावा निमित्त आलेल्या युवकांना मोठ्या प्रमाणावर नेमण्याची संधी उपलब्ध झाली.

त्यामधील 40 उमेदवारांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता यावेळी युवांना रोजगार मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील असणारे सहकारी लंकेश ठाकूर, हेमंत ठाकूर, वैभव ठाकूर, अंगद ठाकूर, किरण कुंभार आणि चंद्रकांत नथुराम ठाकूर यांचा सत्कार महेंद्रजी घरत यांच्या शुभहस्ते करण्यात आला.यावेळी मार्गदर्शन करताना महेंद्रजी घरत म्हणाले बेरोजगारांना रोजगार देणे हे माझे पुण्य कर्म आहे एक घरांच्या उदरनिर्वाहाची व्यवस्था लावून देण्याचं काम हे आपल्या युनियनच्या प्राधान्य क्रम आहे आणि आपण सर्व हे काम चांगले करत आहात याबद्दल मला आपला अभिमान आहे. यावेळी एन.एम.जी. के.एस संघटनेचे सर्व पदाधिकारी, सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# शेतकऱ्यांच्या खात्यावर चार हजार ऐवजी दोनच हजार

## सरकारकडून शेतकऱ्यांची चेष्टाः प्रा. कोलते

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** केंद्र सरकारने पंतप्रधान किसान सन्मान योजना लागू केली. या योजनेच्या माध्यमातून वर्षाकाठी १२ हजार रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात टप्या- टप्याने जमा केले जात होते. याच धर्तीवर राज्य शासनानेही १२ हजार रुपयांची वाढ करून २४ हजार आता शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होणार असल्याची घोषणा केली. मात्र नंतर राज्य सरकारने यात बदल केला आणि ही योजना उशीराने अंमलात येणार असल्याचे सांगितले. यामुळे राज्य शासनाकडून शेतकऱ्यांची वारंवार चेष्टाच केली जात आहे. असा प्रश्न प्रा.जीवन कोलते सामाजिक कार्यकर्ते व शेतकऱ्यांनी उपस्थित केला.



केंद्र शासनाकडून पंतप्रधान शेतकरी सन्मान योजना लागू केली आणि शेतकऱ्यांच्या खात्यावर २ हजार रुपये जमा होवू लागले. वर्षाला सहा हप्यात १२ हजार रुपये शेतकऱ्यांच्या खात्यावर म गील तिन वर्षापासून जमा होण्यास सुरुवात झाली. राज्यातील सरकार बदलल्यानंतर शिंदे सरकारने शेतकऱ्यांनाही राज्य सरकार केंद्र सरकारप्रमाणे मदत करेल अशी घोषणा केली आणि ही मदत या १४ व्या हप्यापासून दिली जाणार असल्याचे जाहीर केले. शेतकरी एकीकडे खुश झाला होता. कारण आता २ हजाराऐवजी ४ हजार रुपये मिळणार या आनंदात शेतकरी वर्ग होता आणि हा हप्ता कधी जमा होईल याची वाट प्रत्येक शेतकरी लाभार्थी पाहत होता. दि. २८ जुलै २०२३ रोजी शेतकऱ्यांच्या खात्यात केंद्र सरकारचे २ हजार रुपये जमा झाले. मात्र या सोबत राज्य सरकारचे २ हजार रुपये जमा न झाल्यामुळे या सरकारच्या निर्णयामुळे तिव्र नाराजी व्यक्त करत आहेत. एकीकडे शेतकरी संकटात आहे. राज्यातील काही भागात पाऊस अधिकचा झाला तर काही भागात अल्प झाला. ज्या भागात अल्प पाऊस झाला तेथे दुबार पेरणीच्या संकटात शेतकरी अडकला आहे तर जेथे अधिकचा पाऊस झाला तेथे ओल्या दुष्काळाने शेतकरी अडचणीत आला आहे. यामुळे केंद्र आणि राज्य शासनाची ही योजना शेतकऱ्यांना तारणार असल्याचे अनेक शेतकरी बोलून दाखवत होते. मात्र राज्य शासनाने यामध्ये यु टर्न घेत ही योजना सध्या लागू झाली नाही. मंत्री मंडळाचा निर्णय झाल्यानंतर शेतकऱ्यांच्या खात्यात दोन हजार रुपये जमा केले जातील अशी भुमिका घेतली. यामुळे शेतकरी वर्गात राज्य शासनाच्या विरोधात सध्या चिड निर्माण झाली आहे.

औरंगाबाद जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून पावसाने हाहाकार माजवला असून अनेकांच्या शेतीतील पिके वाहुन गेली. यातच शासनाकडून कोणतीही मदत किंवा घोषणाही अद्याप झालेली नाही. अजून प्रशासनाकडून पंचनामेही केले जात नाहीत. केवळ राजकीय नेते मंडळी बांधावर येवून फोटो काढून निघून जात आहेत. मदत कधी देणार अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करीत आहेत. एकीकडे शेतकऱ्यांच्या उत्पादीत मालाला योग्य भाव मिळत नसल्याने शेतकरी अगोदरच सरकारच्या धोरणा विरोधात तिव्र नाराजी व्यक्त करत आहे आणि अशातच शेतकऱ्यांनी कोणतीही मागणी न करता राज्य सरकारने दोन हजार रुपयांची घोषणा केली. ही घोषणा हवेतच विरगळली काय? केवळ शेतकऱ्यांच्या बाबतीत हे सरकार घोषणा करत आहे. हे सरकार शेतकऱ्यांचे आहे अशी वल्गना करत असून खऱ्यज्ञा अर्थाने शेतकऱ्यांच्या जखमेवर मिठ चोळण्याचा प्रकार राज्य सरकार करत असल्याची तिव्र भावना शेतकऱ्यांतून आता उमटत आहे. यामुळे राज्य सरकारने शेतकऱ्यांची चेष्टाच केली काय अशी माहिती प्रा.जीवन कोलते सामाजिक कार्यकर्ते सावळदबारा यांनी बोलताना सांगितले.





# जनआक्रोश मोर्चाला उदंड प्रतिसाद

## हजारो हिंदु बांधवांची उपस्थिती; पोलिसांचा चौक बंदोबस्त

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** शहरात काल दिनांक 30 जुलै रोजी लव्ह जिहाद व धर्मांतराच्या विरोधात हिंदु जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चात फुलंब्री तालुक्यातील हजारो हिंदु बांधवांची उपस्थिती होती. शहरातील बाजार समितीपासून तर औरंगाबाद रोडसह खुलताबाद रोड पर्यंत हजारो हिंदु बांधव एकत्र आले होते. शहरात जय भवानी जय शिवराय व जय श्रीराम यासह अनेक घोषणा देत परिसर दणाणून गेला होता.

तसेच पुढे खुलताबाद रोडवर सभेत रुपांतर झाले, या सभेला प्रमुख वक्ते म्हणून धनंजय देसाई यांनी उपस्थित असलेल्या नागरिकांना संभोधित केले.

या वेळी विविध मुद्द्यांवर प्रखर मत व्यक्त करत चर्चा केली. सभेसाठी आलेल्या नागरिकांना पोलिस संरक्षण देणयात आला होता. यात औरंगाबाद ग्रामीण पोलीस अधीक्षक मनीष कालवानीया अप्पर पोलीस अधिक्षक सुनील लांजेवार, उपविभागीय पोलिस अधिकारी जयदत्त भवर यांच्या सह अडीशे तीनशे पोलिसांचा बंदोबस्त ठेवण्यात आला होता. यावेळी आमदार हरिभाऊ बागडे माजी आमदार डॉक्टर कल्याण काळे वरुन पाथ्रीकर, विजय औताडे भाजपा जिल्हाध्यक्ष सुहास शिरसाट योगेश मिसाळ राम बनसोड वाल्मीक जाधव सुशीला फुगे ऐश्वर्या अनुराधा चव्हाण गाडेकर अभिषेक गाडेकर रवींद्र काथार मनोज चिकटे सुदाम मते संदीप बोरसे, चंद्रकांत जाधव राहुल डकले यांच्या सह सर्व पक्षीय नेते, कार्यकर्ते व नागरिकांची उपस्थिती होती.

# १३ ऑगस्टला धनगर समाज निर्धार मेळावा

आधुनिक केसरी न्यूज

**सिल्लोड :** महाराष्ट्रातील धनगर समाजाचे अनेक प्रश्न गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित आहेत. याबाबत सरकारला पुन्हा हालचाली करण्यास भाग पाडण्यासाठी जय मल्हार सेना यांच्या वतीने सिल्लोड येथे राज्यव्यापी धनगर समाज निर्धार मेळाव्याचे १३ ऑगस्ट रोजी आयोजन करण्यात असल्याची माहिती संयोजक लहुजी शेवाळे यांनी दिली. शहरातील शासकीय विश्रामगृहात शुक्रवारी झालेल्या पत्रकार परिषदेत बोलताना लहुजी शेवाळे म्हणाले की, धनगर समाजातील सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसाहाय्य उपलब्ध करून देणे, मेंढपाळांना बंदुकीचा परवाना देणे, धनगर समाजाचे अनुसूचित जमातींमध्ये आरक्षण, मेंढीचाही
विमा आदी धनगर समाजाच्या प्रलंबित मागण्यांसाठी पुन्हा एकवार शासनाचे लक्ष वेधण्याकरिता या धनगर समाज निर्धार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून राज्याचे अल्पसंख्याक मंत्री अब्दुल सत्तार, ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, आमदार संजय गायकवाड, आमदार सुहास कांदे, आले आमदार संतोष दानवे, आमदार उदयसिंग राजपूत आदी अनेक मान्यवर नेते उपस्थित राहणार असल्याचे या वेळी त्यांनी स्पष्ट केले. पत्रकार परिषदेस माजी नगराध्यक्ष पांडुरंग दुधे, नगरसेवक सुनील दुधे, माजी जिल्हा परिषद सभापती गोविंद भोजने, कारभारी दांगोडे, दिगंबर गोरे, तुळशीराम सागरे, कचरू वाणी, देविदास दांगोडे आदींची उपस्थिती होती.




# हिवराळे क्लिनिक ॲण्ड हर्बल हेल्थ केअर

9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन, ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद

उपलब्ध सुविधा

- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे

पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद






# गोरक्षक परमेश्वर स्वामी व संदीपभाई महाराज यांचा प्रशस्तीपत्र देऊन गौरव

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** पुसद येथे गोशाळा महासंघ महाराष्ट्र गोरक्षण स्थळे स्मारक समिती पुसद्वारा पूस नदी तीरावर गोरक्षण स्थळी पूजन करण्यात आले गजानन महाराज मंगल कार्यालयात राज्यातील गोरक्षक क्षेत्रात काम करणाऱ्या गोरक्षकांचा गोशाळा ट्रस्ट संचालकांचा रविवारी सत्कार करण्यात आला त्यावेळी जिंतूर तालुक्यातील परमेश्वर स्वामी व संदीपभाई शर्मा या दोन गोरक्षकांचा प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला यावेळी महाराष्ट्रातील पाचशे गोरक्षक उपस्थित होते.

त्यावेळी महाराष्ट्रातील यावेळी अध्यक्ष पदावरून श्री एकबोटे ही बोलत होते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पुसद जिल्हा संघचालक डॉक्टर पंकज जयस्वाल शेखर मुंदडा पुणे ( अध्यक्ष सेवा आयोग ), सुनील मानसिंगा नागपूर ( सदस्य कामधेनू आयोग भारत सरकार ), अशोक जैन मुंबई ( अध्यक्ष महाराष्ट्र प्राणी कल्याण कायदा समिती महाराष्ट्र शासन ), अंकुश रामगडे , संजय भोसले, नेरकर उद्धव ,शाम भारती महाराज, सुभाष जैन अकोला, मनीष वर्मा, नारायण शिंदे महाराज, आयोजक डॉक्टर सुनील सूर्यवंशी अमरावती, नेहरू महाराज, डॉ. मार्कंडेय आदी उपस्थित होते .गोमाता ही कृषीचा आधार आहे . गोमाता नामशेष झाली तर कशी संपेल. अन्नधान्य पिकणार नाही शेती बंजर होईल लोक भुकेने मरतील एवढे सगळे प्रमाद, गोहत्तेने घडतील त्यामुळे गोहत्या वाचविणे हा राज्य सरकारचा कार्यक्रम असावयास पाहिजे असे मत त्यांनी मांडले.

यावेळी नारायण महाराज यांनी गोरक्षकावरील अत्याचार थांबावावे त्यांच्यावरील गुन्हे मागे घ्यावी, अशी मागणी केली.






राजस्थानी मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसा. लि.,परळी वैजनाथ
• मुख्य कार्यालय व शाखा : मोंढा मार्केट, परळी वै, जि.बीड मो.९१३००७२१७८/९१३००७२१८८
• कॉर्पोरेट ऑफिस : २०५/२०६, १ ला मजला, अपना बाजार, जालना रोड शाखा, आकाशवाणी, छत्रपती संभाजीनगर, मो.९१३००७२१७६
अधिक माहितीसाठी : Toll Free No : 1800 419 7501 www.rajasthanimultistate.in

# पावसाळी अधिवेशनात प्राधान्याने शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवा

## जिल्हाध्यक्ष काशिनाथ जाधव यांचे फुलंब्री तहसीलदार यांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** पावसाळी अधिवेशनात प्राधान्याने शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवावे या मागणीचे निवेदन तहसीलदार डॉ. कानगुले यांना शरद जोशी विचार मंच शेतकरी संघटना महाराष्ट्रच्या वतीने देण्यात आले. यावेळी काशिनाथ जाधव जिल्हाध्यक्ष, साईनाथ बेडके फुलंब्री तालुकाध्यक्ष, कृष्णा पाटील गावंडे सरपंच, राजेंद्र पाटील सोटम, भाजपा तालुकाध्यक्ष नरेंद्र देशमुख, भाजपा कार्यकर्ते सुखदेव जाधव, देवीभक्त भानुदास पाटील जाधव, तंटामुक्ती अध्यक्ष आनंदा पाटील भोकरे, प्रगतिशील शेतकरी कारभारी पाटील जाधव, सुभाष गायकवाड, माजी सभापती चेअरमन बाबुराव पाटील जाधव, सोसायटी सदस्य रावसाहेब पाटील सोटम सोसायटी सदस्य व इतर शेतकरी उपस्थित होते. या निवेदनामध्ये सर्वपक्षीय आमदारांनी शेतकरी प्रश्नावर काही बोलावे. अतिवृष्टी अनुदानाचे पैसे अजूनही मिळालेले नाही. पिक विमा मिळालेला नाही. कर्ज माफी मिळालेली नाही. लाईट बिल माफी मिळालेली नाही. नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्याला शासनाने जाहीर केल्या प्रमाणे 50 हजार रुपये आतापर्यंत मिळाले नाही. तसेच दिवसा 12 तास लाईट मिळालेली नाही. शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. अशा स्थितीत शासनाने शेतकऱ्यांकडे लक्ष देणे गरजेचे असताना राज्यात सुरू असलेल्या राजकीय गोंधळात शेतकरी मात्र दुर्लक्षित होत आहे.

शेतकऱ्यांकडे लक्ष द्या...

शासनाला जर अतिवृष्टी अनुदान पिक विमा व पोत्सांपर अनुदान देत नसेल तर माननीय माजी विभागीय आयुक्त श्री केंद्रेकर साहेब यांच्या



मागणीप्रमाणे प्रत्येक शेतकऱ्याला हंगामा करता दहा हजार रुपये देण्यात यावे कीटक नाशिक औषधी कंपन्या प्रत्येक बाटलीवर एमआरपीच्या डबल प्रमाणात किमती छापतात व दुकानदार नगदी पैशाने शेतकऱ्यांना अर्ध्या किमतीत औषधी विकतात व अर्धी किंमत शेतकऱ्याच्या नावे लिहून ठेवतात व शेतकऱ्याचा पिक निघाल्यानंतर उर्वरित रक्कम वसूल केले जाते म्हणजेच शेतकऱ्यावर दिवसा दरोडा टाकल्यासारखे आहे तरी आपण याकडे सुद्धा लक्ष द्यावे राज्यात जरी "नवा गडी , नवा ,राज" आलेला आहे, परंतु शेतकऱ्यांच्या समस्या मात्र ज्या पूर्वी होत्या त्याच आजही कायम आहेत.

सरकार कोणतही असो शेतकऱ्यांना मदत करा.

जनता आहे म्हणून, आपण आहोत ही जाणीव असणे म्हणजेच एक उतम नेतृत्व असल्याचे लक्षण आहे. जर माननीय महोदयांनी वरील सर्व अटीची पूर्तता केली नाही तर आम्ही कोणत्याही राजकीय नेत्यांना गावात फिरू देऊ नका असे आवाहन तमाम शेतकऱ्यांच्या वतीने करण्यात येत आहे.




# रक्तदान शिबिराच्या आयोजनाने शालिवाहन बँकेचा वर्धापनदिन

## नेत्र तपासणी, १०० ठिकाणी वृक्षारोपण

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** आर्थिक पाठबळावर भौतिक सुविधा मिळवता येते. व्यवहार आणि प्रपंचात याची आवश्यकता आहेच. परंतु तेव्हढीच किंबहुना अधिक गरज परमार्थाची आहे. त्यासाठी रंजल्या गांजल्यांची सेवा, गरजवंताला आधार आणि कृतीशील माणुसकी ही त्रिसुत्री आम्ही शालिवाहन पतसंस्थेच्या माध्यमातून आचरणात आणली आहे.' असे प्रतिपादन चेअरमन किशोर चौहान यांनी केले. २६ व्या वर्धापन दिनानिमित्त ते बोलत होते.

शालिवाहन नागरी पतसंस्थेच्या २६ व्या वर्धापन दिनानिमित्त आज ६५ जणांनी रक्तदान केले. तर ३५० नेत्ररुग्णांची तपासणी करून ७५ जणांवर मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच ढोलेश्वर मंदिर परिसरात १०० रोपांची लागवड करुन पदाधिकाऱ्यांना वृक्षसंवर्धनाच्या जबाबदाऱ्या देण्यात आल्या आहेत. अशी माहिती चेअरमन किशोर चौहान यांनी दिली.

शालिवाहन नागरी पतसंस्थेच्या वतीने गेल्या २६ वर्षात १ लाख ५ हजार रुग्णांची तपासणी करून तब्बल ११ हजार रुग्णांवर यशस्वी मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. यावर्षीही हा उपक्रम राबविण्यात आला. महाराणा प्रताप चौकातील नाथप्लाझा येथे सकाळी १० ते दुपारी ३ या दरम्यान हे शिबिर पार पडले. यावेळी लहान मुलांची तिरळेपणाची मोफत तपासणी करून अल्पदरात चष्मे वाटप करण्यात आले. ढोलेश्वर महादेव मैदान व बाजारतळ येथे १०० ठिकाणी वृक्षारोपण करुन विविध पदाधिकाऱ्यांना वृक्षसंवर्धनाच्या जबाबदाऱ्या देण्यात आल्या आहेत. आर्ट ऑफ लिव्हिंग व गोवत्स परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने हे उपक्रम राबविण्यात आले. याप्रसंगी बँकेच्या वर्धापनाच्या शुभेच्छा देण्यासाठी पैठण व्यापारी महासंघाचे अध्यक्ष पवन लोहीया,सचिव बलराम लोळगे,जगदीश लोहीया,योगेश लोहीया,संत एकनाथचे माजी संचालक राजेंद्र औटे,चितळे सर यांची उपस्थिती होती. चेअरमन किशोर चौहान, व्हा. चेअरमन डॉ जयंत जोशी, मानद सचिव प्रकाश कासलीवाल, संचालक डॉ. पंडित किल्लारीकर, गणेश लोहिया, बाबा राऊत, सुनील शेळके, दीपक लखमले, सुमनबाई म्हस्के, सुमनबाई चौहान, तज्ञ संचालक ॲड राजेंद्र गोर्डे, मुख्य कार्यकारी अधिकारी लक्ष्मण गायके व शाखा व्यवस्थापक भारत कोंगे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कर्मचारी रामदास संदलसे, ज्ञानेश्वर मानधरे, हेमंत भवरे, ज्ञानेश चौहान, देवीदास पूर्णपात्रे, राहुल नवगिरे

सुरज शंकरे, विश्वास कावसानकर, श्रीनिवास गोसावी, परिक्षीत गोसावी, प्रीतम घोडके, उज्वला म्हस्के व जयश्री अंबेकर यांनी परिश्रम घेतले.

# वैजापूरकरांना गणित विषय झाला सोपा

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** शहरातील जैन स्थानक येथे कॅलक्युलेटर व कॉम्प्युटर पेक्षाही जास्त गतीने गणित सोडणारे, तब्बल सहा वेळा विश्वविक्रम केलेले, मानवी संगणक म्हणून प्रख्यात गौरव भंडारी यांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ज्यामध्ये आपल्याला गणित सोडवणे आणखी सोपे कसे होईल ? याच्या विविध क्लृप्त्या दाखवण्यात आल्या. कारण गणित हा विषय अवघड ज्यात गणितातील सूत्रे, कोणत्याही तारखेचा वार काढणे,आवर्त सारणी पाठ करणे कसे शक्य होईल ? तसेच परीक्षेत चांगले मार्क मिळवण्याच्या टिप्स ची माहिती देण्यात आली. यावेळी वैजापूर मर्चंट बँकेचे चेअरमन विशाल संचेती, वर्धमान नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन रुपेश संचेती, संचालक निलेशकुमार पारख, सागर संचेती, जैन सोशल ग्रुप ऑफ वैजापूर चे परेश संचेती, सुनंदीलाल बोथरा, प्रवीण संचेती, मनेष संचेती, परीश कोठारी, हेमंत हिरण, महेश हिरण, मनिल हिरण, दिपक सारडा, किरण सारडा, मार्गदर्शक प्रफुलकुमार संचेती, गणेश बाकळे, सौ.डिंपल बोथरा, सौ.नयना संचेती, सौ.शितल संचेती, सौ.सुप्रिया संचेती, सौ.राखी हिरण, सौ.सपना संचेती, सौ.वर्षा पारख, सौ.हर्षिता कोठारी, सौ.सविता संचेती, शिक्षक उपस्थित होते. सुत्रसंचलन सौ.शितल संचेती यांनी तर आभार प्रदर्शन निलेशकुमार पारख यांनी केले. कार्यक्रमासाठी रवींद्रकुमार संचेती, हेमंतकुमार संचेती राजेशकुमार संचेती, प्रकाशचंदजी बोथरा यांचे मार्गदर्शन लाभले.



# वाघला येथे चिंतन शिबिर उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** भारतीय बौद्ध महासभा शाखा वैजापूर यांच्या वतीने मौजे वाघला या ठिकाणी रविवार दि 30 जुलै रोजी चिंतन शिबिर या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात बुद्ध वंदना घेवून करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष नामदेव त्रिभुवन,रमेश जाधव,अनिल राऊत,प्रा.मंगलाताई झिने,सरस्वताई काशीद यांनी भारतीय बौद्ध महासभेचे नियम, सभासद नोंदणी,आपण बौद्ध आहोत का ? डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची धम्म क्रांती, गाव तेथे शाखा आदी बद्दल मार्गदर्शन केले. यावेळी यशवंत पड़वळ, शंकर पठारे, आयु डि.के. लक्ष्मण ( आन्ना ) धनेश्वर, संजय बागुल, भाऊसाहेब थोरात ( लासुरगाव ), विलास पगारे,सुभाष थोरात, बाबासाहेब सोनवणे, लक्ष्मण सोनवणे, बंडुजी आल्हाट, प्रशांत दिवेकर, नवनाथ आढाव, अभिषेक पगारे, शिवाजी पठारे आदींनी मनोगत व्यक्त केले तर कारभारी पवार, बाबासाहेब पगारे ( शिवूर ), किशोर पठारे,रावसाहेब पठारे, शातांवण बागुल, श्रीहरी प पठारे, बाळु पठारे, बाबासाहेब बागुल, ( खरज ), विमलबाई पठारे, सुमनबाई पठारे, शंकुतलाबाई पठारे, आशाबाई पठारे,मोनिकाबाई शिनगारे आदींसह पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक यशवंत पडवळ यांनी तर सुञसंचालन शंकरराव पठारे यांनी केले. प्रसंगी आभार प्रदर्शन विजय पठारे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भारतीय बोद्ध महासभा उपासक उपासिका गावकरी मंडळी आदींनी प्रयत्न केला.

# शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी व्हाट्सॲप जारी

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात सध्या : शेतकऱ्यांची पीक लागवड करण्याची लगबग सुरु आहे. आतापर्यंत



योग्य प्रमाणात पाऊस पडल्याने शेती कामांना वेग आला आहे. अशातच शेतकऱ्यांची बियाणे, कीटकनाशके, खतांमध्ये मोठ्या प्रमाणात फसवणूक होत असते. याच फसवणुकीच्या पार्शवभूमीवर कृषी विभागाने शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी व्हाट्सॲप क्रमांक जारी केला आहे.

शेतकऱ्यांना पेरणी दरम्यान काही अडचणी आल्यास व्हाट्सॲ प संदेशाद्वारे आपली तक्रार नोंदवता येणार असल्याची माहिती तालुका कृषी अधिकारी मदन सिसोदिया यांनी दिली आहे. तक्रारींचे तात्काळ निवारण करण्यासाठी कृषी विभागाने कार्यान्वित केलेला अधिकृत व्हाट्सॲ प नंबर ९८२२४४६६५५ हा आहे. या नंबरवर 123 ) शेतकऱ्यांनी संदेशाद्वारे आपली तक्रार नोंदवावी असे आवाहन सोयगाव कृषी विभागाचे कृषी अधिकारी मदन सिसोदिया यांनी केले आहे. तसेच ८४४६११७५००, ८४४६२२१७५० किंवा ८४४६३३१७५९ या भ्रमणध्वनीवर संपर्क देखील साधू शकता. याशिवाय कृषीविषयक योजनांच्या माहितीसाठी १८००२३३४००० हा कृषी विभागाचा हेल्पलाईन क्रमांक आहे.त्यामुळे शेतकऱ्यांना योजनांची माहिती हवी असल्यास या नंबरवर संपर्क साधायचा आहे.

शेतकऱ्यांची तक्रार कृषी आयुक्तालयाकडून निवारण कक्ष देखील सुरु केला आहे. हा कक्ष २४ ७ कार्यरत असणार आहे. तसेच शेतकरी आपली तक्रार controlroom. qe.maharashtra@ gmail. com या इमेल पत्त्यावर देखील करु शकतात. तसेच सर्वात महत्वाचे म्हणजे तक्रार करणाऱ्या व्यक्तींची नावे गोपनीय ठेवण्यात येणार आहे.अशी माहिती तालुका कृषी अधिकारी मदन सिसोदिया सोयगाव यांनी बोलताना सांगितले.





# उद्योजक मनोज पवार यांनी केले हजयात्रेकरूंचे केले स्वागत

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्याचे राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष अहेमद अली गेल्या 40 दिवसांपासून हज यात्रेवर होते. त्यांची हज यात्रा सुखरूप झाली असून कन्नड येथेल निवासस्थानी यावेळी उद्योजक मनोज भाऊ पवार व त्यांच्या मित्र मंडळांनी अहेमद अली भैय्या यांचे स्वागत केले. यावेळी योगेश पवार, मनोज देशमुख, सोमनाथ दाभाडे, संदिप नरवडे, पवन ठाकुर, संतोष पवार , रुपेश भारूका, योगेश त्रिभवन, संदेश पवार, बंटी जाधव शंकर इत्यादी यांची उपस्थिती होती.

# वैजापुरात अधिक मांसनिमित्त गोर-गरीब, दीन-दुबळ्यांना अन्नदान वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** सरला बेटचे महंत सद्गुरू गंगागिरीजी महाराज यांची "लेनेको हरिनाम-करन को अन्नदान "ही परंपरा लाभलेली आहे. याचाच भाग म्हणून शनिवार( ता.२९ ) रोजी येथील आर्ट ऑफ लिव्हिंग ग्रुप च्या वतीने संकट मोचन मंदिर समोर बसणाऱ्या दीन, दुबळ्या, गोर-गरीब व दिव्यांग यांना अधिक -श्रावण महिन्याचे औचित्य साधत खिचडीचे अन्नदान करण्यात आले. या भुकेल्या चेहऱ्यावर अन्नाचे द्रोण मिळाल्या बरोबर आनंद ओसंडून वाहताना दिसत होता. या ग्रूपच्या प्रमुख वर्षा शिंदे दीदी व समाज कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत यांनी व ग्रुप सदस्यांनी सकाळी साडे सात वाजता हे अन्नदान केले. त्यांना सुनील गायकवाड, अमर भाटिया, सूरज राजपूत, अलका साखरे, साक्षी टेके, सुमन पोंदे,निर्मला दाभाडे, साबरे इत्यादींनी सहकार्य केले.



# आ. ठाकूर यांना जिवे मारण्याची धमकी

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान या संघटनेचे संस्थापक संभाजी भिडे यांनी अमरावतीत महात्मा गांधी यांच्याविषयी केलेल्या अवमानजनक वक्तव्याच्या विरोधात काँग्रेस पक्ष आक्रमक झाला आहे. आमदार यशोमती ठाकूर यांनी संभाजी भिडे यांच्या अटकेची मागणी केली आहे. दरम्यान समाज माध्यमावरून एका व्यक्तीने यशोमती ठाकूर यांना जिवे मारण्याची धमकी दिली आहे.

संभाजी भिडे यांच्या विरोधात जास्त बोललात, तर दाभोळकर करू, असा इशारा संबंधित व्यक्तीने दिला आहे. यशोमती ठाकूर यांनी सांगितले की, आपल्याला जी धमकी देण्यात आली आहे, त्याची जबाबदारी गृह विभाग, पोलीस यंत्रणा घेईल. समजा माझ्या जिवाचे बरेवाईट झाले, तर हे धारकरी, भाजप, पोलीस विभाग तसेच भाजपचे खासदार डॉ. अनिल बोंडे हे जबाबदार राहतील, असे त्यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले. आपण अशा धमक्यांना घाबरत नाही. आपण आपल्या भूमिकेवर ठाम आहोत, असेही त्या म्हणाल्या.

# कमी पावसामुळे फुलशेती नष्ट; फुलशेतीला विमा कवच नाही

आधुनिक केसरी न्यूज

**दादासाहेब घोडके**

**पैठण:** तालुक्यात पावसाची ' कही खुशी कही गम ' अशी स्थिती आहे. काही भागांमध्ये समाधानकारक पाऊस पडला असला तरी काही गावांमध्ये अपुऱ्या पावसामुळे पिकांना फटका बसत आहे. पैठण तालुक्यातील वडवाळी शिवार येथील शेतकरी भगवान घटे यांची फूल शेती कमी पावसामुळे नष्ट झाली आहे . फुलशेतीला विमा कवच नसल्याने सरकारने मदत करण्याची मागणी घटे यांनी केली आहे . नगदी पीक म्हणून फुलशेतीकडे पाहण्यात येते . मागील चार वर्षांपासून समाधानकारक पाऊस पडत असल्याने फुलशेती बहरली होती. मात्र , यावर्षी कमी पावसामुळे फुलशेतीत लावलेलाखर्च निघणे अवघड झाले आहे .पैठण येथील कहारवाडा येथील तरुण शेतकरी भगवान घटे यांची वडवाळी परिसरात शेती आहे. ते दोन एकर शेतीवर फुलशेती करतात. मात्र, समाधानकारक पावसाअभावी फुलझाडे सुकून गेली आहेत.



**दीड लाखांचे उत्पन्न अपेक्षित :** यावर्षी भगवान घटे यांना फुलशेतीतून जवळपास दीड लाख रुपयांचे उत्पन्न अपेक्षित होते . कुटुंब यावरच उपजीविका करतात . शेतातून काढलेली फुले ते रोज पैठण येथे जाऊन विकतात . मात्र , फुलशेती नष्ट होत असल्याने घटे हवालदिल झाले आहे . या व्यवसायाला विमा कवच नसल्याने सरकारी अनुदान मिळत नाही . त्यातच आता निसर्गाने साथ न दिल्याने फुल शेती करणार्यांचा बिकट प्रश्न निर्माण झाला आहे .

**दहा वर्षांपासून फुलशेती :** भगवान घटे हे दहा वर्षांपासून फुलशेती करतात . पदवीपर्यंत शिक्षण पूर्ण करून देखील नोकरी न मिळाल्याने त्यांनी दोन एकरावर फुलशेती करण्यास सुरुवात केली . त्यांनी यावर्षी त्यानी फुलशेतीला हजारो रुपये खर्च केले . यात गलांडा , गुलाब , झेंडू या फुलांची लागवड केली . जून महिन्यात पावसाने ओढ दिल्याने झाडे सुकली जुलै महिना संपायला आला तरी , पावसाने दमदार हजेरी न लावल्यामुळे तसेच खराब वातावरणामुळे रोपांवर अळीचा प्रादुर्भाव झाला आहे . धुके व जोराचा पाऊस नसल्यामुळे संपूर्ण झाडे वाळून गेली आहेत .

# बेटी बचाओ-बेटी पढाओबाबत जनजागृती

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** खंडाळा येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत नुकताच "बेटी बचाओ-बेटी पढाओ"हा जन जागृती कार्यक्रम घेण्यात आला,"मुलीच्या जन्माचे-स्वागत करू या","मुलगा मुलगी समान समजू या"मुलांसारख मुलींना ही उच्च शिक्षण देऊ या"मुलांपेक्षा मुलगी बरी ,सुख देते दोन्ही घरी"अशा घोषणा देत माजी शिक्षणाधिकारी धोंडीराम सिंह राजपूत यांनी उपस्थिताना मुलीच्या जन्माचे स्वागत करून मुलींना मुला समान समजून त्यांनाही परिपूर्ण शिक्षण द्यावे ,मुलांसारख्या सर्व शैक्षणिक सुविधा मुलींना पुरवा असे आवाहन करून,मुलींनी ही परिपूर्ण शिक्षण घ्यावे असे सुचविले, मुलींनी स्वतः स्वावलंबी बनण्याची तयारी ठेऊन उच्च शिक्षण घ्यावे व स्वतःचे करिअर घडवावे असे आवाहन केले, शिक्षण अधुरे सोडू नका,,प्रयत्नांची पराकाष्ठा करा व आवडते ते क्षेत्र निवडून आपले ध्येय गाठा असे राजपूत पुढे म्हणाले,या प्रसंगी केंद्र प्रमुख मनोज गव्हाणे,छाया बंगाळ उपस्थित होते.



गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका

(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर